

ब्रह्मलीन प.पू.स्वामी प्रभानंदजी विरचित, श्रीसारदादेवींचे संक्षिप्त गीतचरित्र
Premganga

# प्रस्तावना

माझे गुरुदेव **ब्रह्मलीन प.पू.स्वामी प्रभानंदजी** यानी **श्रीसारदादेवी यांचे जीवनचरीत्र** गद्य व पद्य स्वरूपात रचना करून यापुर्वी प्रकाशीत केलेल्या प्रेम गंगा या पुस्तीकेची दुसरी आवृती, **आश्रमाचे सुवर्णमहोत्सवी वर्षात** प्रकाशीत होताना अत्यानंद होत आहे.या कामी **शारदा आश्रम जांभ-नेलुरच्या जेष्ठ गुरुभगीनी भक्ती मॉ व स्वामी श्री सेवानंद महाराज** , **श्री.रामकृष्ण विवेकानंद सेवा समिती भादोले जि.कोल्हापूर** यांचे सहयोग आणि श्री विनयानंद , निरंजन आश्रम मौजे वडगांव जि.कोल्हापूर यांचे विशेष प्रयत्नातून हे घडत आहे.या कामी अनेक भक्तांचे परिश्रम आणि शुभ कामना कारणीभूत आहेत.विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे या पुस्तीकेच्या छपाईचा खर्च स्वामींच्या परमभक्त सौ.सुलेखाताई चौगले वास्को यानी अत्यंत भावपूर्ण अंतःकरणाने करून माताजींची ख-या अर्थाने सेवा केली आहे. या पुस्तीकेचा सर्व सद्भक्तानी श्रद्धापूर्वक चिंतन करून आपले जीवन सार्थक करावे ही विनम्र प्रार्थना

**रविवार दि.4 मे 2003**

**स्वामी भवेशानंद**
**श्री.रामकृष्ण आश्रम कारवार (कर्नाटक)**

---

## श्रीसारदादेवींची आरती

ओवाळूं आरती श्रीसारदेसी
तन मन अर्पू हृदयिं साठवूं विश्वमोहिनीसी ।।धृ।।
जीवदुःख देखुनी चतुर्दश भुवनांची राणी
लेवुनि लेणे मानवि तनुचें आलि दीनधामीं ।।
पावित्र्याचा भानु उगवतां श्रीरामकृष्ण
तेज तयाचें होई सारदा साधू कल्याण ।।
धर्म कर्म हीं दोन्ही पितरें लोपुनि जग पोरकें
होइ तेधवां ब्रह्मशक्ति ये जगन्मातृभावें ।।
धन्य झालों धन्य झालों सारदेसि भेटलों
लख चौ-यांशी फेरे चुकवुनी अमरपदा पावलों ।।

---

**||ओम्||**

**प्रेमगंगा**
**(श्रीसारदादेवींचे संक्षिप्त गीतचरित्र)**

**रचनाकार :-**
**प.पू.स्वामी प्रभानंदजी,श्रीरामकृष्ण आश्रम कारवार (कर्नाटक)**

**जी देवी शक्तिरूपाने स्थिता स्थिरचरान्तरीं ।**
**तिच्या कृपाप्रसादें मी चिन्तावें तिज अंतरीं**
**जी देवी मातृरूपाने वसते सकलांतरीं ।**
**त्या देवी सारदेसी मी स्मरावें नित अंतरीं**
**ज्ञानदात्री भक्तिदात्री सर्वसंतापहारिणी ।**
**सर्वसारप्रदात्री जी देवी श्रीसारदामणी**
**अपात्रा या करो पात्र तिचें चरित गायिण्या ।**
**गाण्या न खास मी शक्त तिच्या शुभवराविना**
**अथांग सागरामाजीं स्तवांच्या तिज अर्पिल्या ।**
**हा एक बिंदु गीताचा प्रेमपूर्वक वाहिला ||1||**

जीव ब्रह्मस्वरूपच आहे' असा घोष करीत वेदनदी अनादि कालापासून वाहत आहे. प्रत्यहींच्या प्रार्थनेंतून व स्तोत्रपाठांतून मानवी कंठाद्वारा याच वेदवाणीचा प्रतिध्वनि उमटत आहे; परंतु त्याचा उपयोग काय? तो कंठ आणि कर्ण यांमध्येंच नुसता ये-जा लावीत राहिला! जीवनवृक्षाचें अळें जें अंतःकरण-आंतला कर्ण-त्यापर्यंत पोहोचलाच नाही! ज्ञानामृताचे सारे पाट फुटून मुखावाटेच असे ओसंडूं लागल्यावर मानवी जीवनवृक्षाचें पोषण होईल कसें? मानव निःसार, निष्प्रभ होऊं लागला.

वेदनदीने विचार केला,'आतां काय करावें?' मी या मानवांच्या कानांत ओतलेल्या बोधामृताचा मुखावाटे होणारा निचरा थांबवावा कसा? हें अमृत त्याच्या पचनी पाडावे कसें? या विचाराने ती अस्वस्थ झाली. दुःखी जनांच्या कळवळ्याने ती प्रेमगंगा बनली; आणि अंतीं मानव होऊनच मानवांना बोधदुग्ध पाजूंया या विचाराने आपला परम प्रिय भक्त रामचंद्र मुखर्जी यांच्या सदनीं अवतरली.

श्री रामचंद्र मुखर्जी हे जणूं निष्ठा, सदाचार, भक्ति आणि दया यांचे साकारित आविष्कार. त्यांची साध्वी पत्नी, श्री श्यामासुंदरीदेवी, ही सुध्दा भोळ्याभावाची, निष्कपट नी निस्वार्थ प्रेमाची, मधुर विरक्तीची पुतळी. आपल्या पावित्र्याने सर्व जनमनांतील सर्व पापप्रवृत्तींना धुवून काढण्यासाठीं

वाहणारीं जणू स्वर्गीय सरिता. बंगालमधील एका आड भागाच्या पवित्र सुंदर कुशीत वसलेलें खेडें, जयरामबटी, हें या ब्राह्मण दांपत्याचें निवासस्थान.

भूदेव रामचंद्र मुखर्जींच्या तपोबलाने पावन झालेलें जयरामबटी खेडें, तसाच त्यांच्या नितान्तमधुर, अशा भक्तिगंधाने सुगंधित झालेला त्यांचा कुटीर साक्षात् भगवतीला देखील आकर्षक वाटावा यांत नवल तें काय?

शास्त्र आणि संत आम्हाला सांगतात की निर्गुण ब्रह्मतत्त्व, अघटित घटना घडवून आणणें हाच जिचा स्वभाव, अशा आपल्या अचिन्त्य, अतर्क्य मायेचा आश्रय करून, सगुण होतें-साकारतें. उन्हाळ्यांत उष्णता फार वाढली असतां वायूचें वाहन करून ढग येतात व आपल्या शीतल वृष्टीनें पृथ्वीचें ताप शमन करतात. तशाच प्रकारें जेव्हां जेव्हां जगांत दुर्भाव-दुराचारादी वाढतात तेव्हां तेव्हां ब्रह्म प्रेमाचे वाहन करून दृश्य विश्वांत प्रकटतें आणि दुर्वृत्तांचें आणि दुर्वृत्तींचे दमन करतें; सच्चित्सुखसरोवरांतून 'प्रेमगंगा' बनून अवतरतें.

आधीं गर्जना करून नंतरच मेघ वृष्टि करतात. सभ्य गृहस्थ चोरट्या पावलांनी कोणाच्या घरांच सहसा शिरत नाहींत. तसाच देवही पूर्वसूचना देऊनच अवतरत असतो! आणि हें शिष्टाचारास धरूनच आहे. अति पवित्र अशा देवाचें अत्यंत शुध्द अंतःकरणानेच स्वागत करावयाचें असतें. ध्यानादिकांच्या समयीं देखील आपण अगोदर शुध्द करून-रागद्वेषांना दूर सारून-नंतरच इष्टदैवताचें चिंतन करतों ना? तसेंच देव घरांत येणार असा दिलासा मिळाल्यावर त्याच्या स्वागतार्थ भक्ताने सज्ज राहिलें पाहिजे. या गोष्टीची दखल घेऊनच की काय देव आपल्या आगमनाची पूर्वसूचना देत असतो-दृष्टांत घडवितो. सूक्ष्म जगांत भेट देऊन मग स्थूल जगतांत उतरतो. देहाहून मनास तो अधिक जवळचा. आधीं मनानें त्यास ओळखावें, नंतर देहभूमीवरून त्यास पहावें.जोंवर तो चर्मचक्षूंस दिसत नाहीं तोंवर त्यास मनचक्षूंनीच पहावें.

आपल्या पवित्र भक्तांनी अधिक पवित्र व्हावें, अत्यंत जागरूकतेने त्यांनी आपलें जीवन कंठावें या सदिच्छेने देव आपल्या भक्तांस अनेक दृष्टांत घडवितो आणि नंतर पार्थिव पातळीवर उतरतो-अवतार घेऊन त्यांच्या घरीं जन्म घेतो. याचें प्रात्यक्षिक रामचंद्राच्या जीवनांत आम्हास सांपडतें.

एके दिवशीं सदैव भावविवश होऊन राहणा-या रामचंद्रांना वामकुक्षी घेत असतां एक दृष्टांत घडला.

**जयरामबटी पुण्यक्षेत्र । तेथें मुखर्जी कुळीं पवित्र ।**
**रामचंद्र नामें सुपात्र । ब्रह्मवर्य वसतसे ।।**
**तयाचिये धामीं मंगल । वर्तलें परिसा नवल ।**
**जिणें व्यापिलें भूमंडल । बालिकारूपें प्रकटली ।।**
**ती विप्रमानसीं तरळे । घाली मिठी लडिवाळें ।**

**निजांगींच्या परिमळे । कोंदित दशदिशा ।।**
**शशीची चंद्रिका जैशी । भानुकरांचा ताप नाशी ।**
**तिची लावण्यकान्ती तैशी । सुखविते रामचंद्रा ।।2।।**

आपण पाहिलेली ही दिव्य बालिका साक्षात् भगवतीच असावी हें रामचंद्रांच्या मनाने हेरलें. पण तिच्या अशा दर्शनाने अनुग्रहीत होण्यास आपण पात्र आहोंत असें मात्र त्यांस वाटेना. त्यांचीं ईशभक्ति, लोकसेवेचें प्रेम, दीनदुबळ्याविषयींचा जिव्हाळा हीं सारींच सहज आणि स्वाभाविक अशीं होतीं. आम्रवृक्षाला आपली गोड फळें देऊन आपण इतरांना सुखवितो, इतरांवर उपकार करतों, असें कधीं वाटतें का? सर्वांच्या ठायीं आत्मभाव ठेवणा-या रामचंद्रांच्या बाबतींतही अगदीं तसेंच होते. आपण आचरीत असलेल्या मूक तपाची, उत्स्फूर्त भगवत्सेवेची, स्वतः रामचंद्रांना जाणीव नव्हती! म्हणूनच त्या कांतिमान बालिकेच्या स्पर्शाने सुखावलेले, तिच्या स्वर्गीय तेजाने दिपलेले रामचंद्र तिला स्वप्नांतच विचारतातः

**‘कोण कुठुनि तूं आलिस बाळे सत्वरि सांग मला।**
**तापत्रयें पोळल्या जिवावरि अमृतबिंदु सिंचिला ।**
**या दीनाचा देवि कां बरें येइ तुला कळवळा ।**
**दान न दिधलें तप नाचरिलें परि लविसि मज लळा‘ ।।3।।**

सद्गद कंठाने विचारलेल्या या भक्ताच्या प्रश्नाला अपार करुणामयी उत्तर देतेः

**‘तुझिया सेवें सुखावलें म्हणुनी मी येथें आलें ।**
**निष्काम तुझी जनप्रीति पाहुनी आलें तुझिया गेहिं मोहुनी**
**तुझ्या करीच्या अन्ना प्राशुनि अनुतप्तां सेवावें‘ ।।4।।**

या घटनेनंतर थोड्याच दिवसांत जयरामबटीच्या गांवक-यांनी भाताची कापणी केली, धान्यलक्ष्मी घरीं आणलीं; आणि आपल्या गरिबीतील सुखाचे क्षण ते अनुभवित आहेत तोंच, 1853 सालच्या डिसेंबर महिन्याच्या 22 तारखेला, रामचंद्र मुखर्जींच्या पुण्यदेहीं सकलसंतापहारिणी, शुध्ददानप्रदायिनी, भगवती, सारदामणीच्या रूपांत अवतरली.

भगवती सीता, येसू-ख्रिस्त, इत्यादि अवतार अयोनिसंभव असल्याची इतिहासपूर्व कालांतील नोंद आहे. अगदींच अलिकडच्या काळांतील अशीच विश्वासार्ह घटना म्हणजे श्रीरामकृष्णांचा जन्म. श्रीसारदादेवी म्हणत, ‘माझ्या जन्माची कथादेखील यांच्याच सारखी आहे.’ अपौरूषेय गर्भाधानाच्या रहस्याची उकल येणेप्रमाणे करतां येईलः

सामान्य जीव मरणसमयीं आपल्या सूक्ष्मशरीरासकट (मनइंद्रियांसमवेत) उत्क्रमण करतात; आणि आपल्या अतृप्त विषयवासना पुरवून घेण्यासाठीं नूतन देह धारण करतात-पुनर्जन्म पावतात. पण याविरुध्द देव, सर्व जीवांच्या वासनांचें उगमस्थान जें ’अज्ञान’, त्याचाच उच्छेद करण्यासांठीं जन्म घेतो. तो सामान्य जीवांप्रमाणे विषयाकृष्ट होऊन

इतस्ततः भ्रमण करणारा एक वासनापिंड नसून असीम, अचिन्त्य चित्सागरांत उठलेला प्रेमाचा स्पंद होय. हा स्पंद म्हणजे सकल जीवांची जीवभूत जी प्रकृती-परमात्म्याची अनिर्वचनीय शक्ति-तिच्यांतून उठलेली, भगवंतानें त्रस्त जीवांच्या आर्त हांकेला दिलेली साद! पृथ्वीपृष्ठावर विशिष्ट जागींच जसा ज्वालामुखीचा स्फोट होतो तसा हा निराकाराचा सगुण आविष्कार योग्य अशा स्त्रीच्या उदरांतूनच होत असतो. त्याच्या आविर्भावास स्त्री-पुरुषांच्या कामाकुल समागमाची आवश्यकता नसते. जो अणुरेणूंत भरलेला आहे, जो लोहकाष्टांदींतूनसुध्दा प्रकटतो, त्यास असा जन्म घेणे काय दुष्कर? श्रीसारदादेवींच्या जन्माची गोष्ट अशीः

**शिहोडग्रामीं श्यामसुंदरी जाई बहिर्दिशेतें ।**
**देवदर्शना घेउनि येतां फिरुनि स्वीय धामातें**
**बसतां शौचा वाटे शिरला वायु उदरिं आगळा ।**
**होइ न शौचा तिथेंचि बसली पोटिं दाब वाढला**
**एवढ्यांत तरुवरुनि चिमुकली दिव्य येइ बाळा ।**
**श्यामसुंदरिस मारि मिठी लडिवाळें कण्ठाला**
**रक्तवस्त्रभूषिता बालिका म्हणे माउलिसी ।**
**‘श्यामसुंदरी आलें आहें मी तव गेहासी‘**
**ऐकुनि वच हें श्यामसुंदरी निंपचित होऊन ।**
**पडली देखुनि जन आणिती तिज गेहीं उचलून ।।5।।**

आपल्या तपोनिष्ठ, पुण्यचरित्र पितरांबद्दल बोलण्याचा प्रसंग आला असतां अत्यंत आदरयुक्त प्रेमाने सारदादेवी म्हणत,

**‘पिता देवभक्त । माता सेवासक्त । दोघेही विरक्त । निरागस ।।**
**जणूं पवित्रता । आणि सरलता । हींच माझा पिता । मूर्तीमंत ।।**
**वाढीतसे अन्ना । अत्यानंदें जनां । तिच्या लोकप्रेमा । पार नसे ।।**
**अशी माझी आई । म्हणोनी मी येई । तियेचिया गेहीं । जन्मोनियां ।।6।।**

रामचंद्र मुखोपाध्याय खरोखरीच देवमानव होते. त्यांचें इष्टदैवत भगवान श्रीरामचंद्र. सदैव श्रीरामचंद्राच्या चिंतनांत राहिल्यामुळे ते पूर्णपणें रामचंद्रमय होऊन गेले होते. अखंड लोकसेवाव्रत धारण केलेल्या, कठोर धर्माचरण करणा-या, पण दुःखितांच्या-अडल्यापडल्यांच्या-दयेने द्रवणा-या, स्वतःच्या वैयक्तिक सुखाविषयीं अत्यंत उदास असून इतरांच्या सुखांतच आनंद पावणा-या, प्रत्यक्ष रघुरायाच्या छायेप्रमाणे ते भासत.

इ.स. 1864च्या सुमारास जयरामवाटींत व आसपासच्या भागांत भयानक दुष्काळ पडला. रामचंद्र मुखोपाध्याय यांच्या घरीं ह्यावेळीं आदल्या वर्षाचें कांहीं भात शिल्लक होतें. त्याचे तांदुळ करून त्यांत उडदाची डाळ मिसळून हंडेच्या हंडे भरून खिचडी तयार करावी आणि दुष्काळग्रस्त लोकांच्या ज्या झुंडी दारीं येत त्यांना ती खाऊ घालावी, हा त्यावेळचा रामचंद्रांचा क्रम असे. त्यांचें सगळें धान्य संपुष्टात आलें. घर रितें झालें. पण

त्यांचें हृदय मात्र अन्नदानाच्या आनंदानें कांठोकांठ भरलें. आपल्या दारिद्र्याची पुसटशी कल्पना देखील त्यांस शिवूं शकली नाहीं. जेथें आनंददीप प्रकाशत आहे तेथें दुःखाचा अंधार शिरेल कसा?

निर्धन कुटुंबात जन्मलेल्या सारदेला दारिद्र्याच्या झोपाळ्यांत पडून दैन्यदुःखाचीच अंगाई ऐकावी लागली. त्यामुळें या देवबालिकेमध्यें आपल्या पार्थिव जीवनाच्या प्रारंभापासूनच असीम दया, निष्काम सेवा, व अपार करुणा या तिच्या दैवी गुणांचा परिपोष व प्रकर्ष होण्यास योग्य अवसर फावला.

ज्ञानवृध्दीचें गांभीर्य, नित्यतृप्तांचें समाधान, स्थिरप्रज्ञाची शान्ति आणि कर्मयोग्याची सेवाप्रीती हे सारे बाळ सारदेचे स्वभावसुलभ गुण होते. अत्यंत अल्प वयांतदेखील शेतकरी कुटुंबास करावीं लागणारीं अनेक अवघड कामें ती लीलेने करीः-

**जलीं जाइ सारु जेंवि मेघिं चंद्रमा । लवमात्र न भीति तिच्या स्पर्शते मना**
**पंकजासनीं वसते सलिलिं जी सदा । वाटे तिज तोयाची भीति का कदा?**
**पंचवर्ष बालिका ही रमा नांदते । चारा आकण्ठ नीरिं क्षेत्रिं कापते ।।7।।**

अति मधुर कण्ठाने गात गात आजूबाजूस न पाहतां, न जातां, उंचच उंच भरारी मारावी पण आपल्या पृथ्वीवरील पिलांवरची नित्य स्नेहल दृष्टि ढळू न द्यावी असा इंग्लंडमधील एका पक्षीणीचा स्वभाव असल्याचें सांगण्यात येतें. अवतारी पुरुषांचें देखील असेंच असतें. अति उच्च भावभूमीवर वसत असतांसुध्दां आपल्या व्यवहारिक जबाबदा-या ते अतीव तत्परतेने पार पाडीत असतात. श्रीसारदादेवी याचें एक उत्तम उदाहरण होत. त्या आपल्या शिष्यांना पुढें सांगत असतः

**'जात असें मी गंगास्नाना । संगें घेउनि तिन्हि बंधूंना ।**
**भगिरथी वाटे आमोदर । अपार श्रध्दा मम गंगेवर ।**
**बाल्यिंहि गंगाभक्ती वाटे । स्नानें आनंदोर्मी दाटे' ।।8।।**

सेवाभाव, उद्योगप्रियता व निर्भयता हे गुण कांहीं इतर मुलांमध्येंदेखील दिसूं शकतील; पण बाळ सारदेचा आगळेपणा होता तो तिच्या दिव्य व्यक्तिमत्त्वांत. तिला पाहतां ती कोणत्या दुस-याच मुलखांतील, लोकांतील, आपल्या मर्त्य भूलोकीं आलेली एक थोर विभूती वाटे. तिची प्रत्येक कृति म्हणजे दिव्यत्त्वाच्या, पूर्णत्त्वाच्या शिखरावरून मोहमुग्ध, अतृप्त, असुखी जनतेकडे वाहणारा प्रेमप्रवाह भासे. याचें कारण, तिचे दिव्य चक्षू! तिच्या अंगप्रत्यंगातून ओसंडणारा गोडवा!

एत्राद्या मुग्ध, लाजाळू मुलीप्रमाणें वावरणा-या सारदेच्या ठायीं प्रौढ जनांतदेखील न दिसून येणारा समंजसपणा, इतर वयस्क व्यक्तींना सुध्दा पेलू न शकणारीं कामें अत्यंय अल्पावधींत उरकण्याची हातोटी, वगैरे पाहून लोकांना अचंबा वाटे. याचें गूढ ते उकलूं शकत नसत. सारदादेवींनी स्वतः पूढें आपल्या भक्तांशीं बोलतांना या रहस्याचा असा स्फोट केलेला आहेः

**‘जाई जेंव्हा मी घरकामा अथवा कापुनि गवत आणण्या।**
**येई नित्य मम संगें बाला मत्सदृश माझ्या मदतीला ।।**
**परी अन्य कुणि तेथें येतां पावे अन्तर्धान क्षणीं त्या।**
**हंसे बागडे संगें खेळे दशवर्षे हें असें चाललें‘ ।।9।।**

स्वानंदसाम्राज्यांतून आपल्या या कर्मभूमीवर प्रकटणा-या अवतारांची आपल्या निजधामाकडे-सच्चित्स्वरूपाकडे-सदैव ओढ असते. आपल्या गोड गाण्यांत अहर्निश रंगून राहणा-या स्कायलार्क प्रमाणे ते निजानंदीं गडून असतात. पण आश्चर्य असें की त्यामुळें त्याचें आपल्या संसारपीडित अपत्यांवरचें प्रेम अणुमात्रही उणावत नाहीं. ताक घुसळल्यावर नवनीत निघावें तद्वत् दुःखांचे चपेटे बसल्यामुळें त्यांच्या हृदयांतून त्यांची अंतःशक्ति (सूक्ष्मशरीर) त्यांच्यासारखें रूप घेऊन बाहेर येते व अनेक कार्यांत त्यांस हातभार लावते.

ही अंतःशक्ति, हे मन, आपल्या अधिष्ठानभूत स्थूलदेहाचेंच रूप घेऊन येते आणि हे साहजिकच आहे. कारण कोणाही व्यक्तिला या जगांत व्यवहार करीत असतां आपल्या स्थूलदेहाशींच तादात्म्यभाव ठेवावा लागतो. स्थूल शरीराचें रूप तेच आपलें रूप असें ती मानते. बरीक एवढें खरें कीं अवतारी पुरुषांचें मन प्राकृत जनांप्रमाणें आपल्या स्थूलशरीराच्या ठिकाणीं अज्ञावकाशात् आसक्त झालेलें नसतें; आणि म्हणूनच तें स्थूल देहापासून सहज वेगळें होतें व अन्य शरीर धरून अत्यंत दुःसाध्य कर्मेदेखील साधण्यास त्यास समर्थ बनवितें. बाळ सारदेच्या मदतीस येणारी मुलगी ही तिचीच अंतःशक्ति!

येथें बाळ सारदा कुमूदकलिके प्रमाणें क्रमाक्रमाणे विकसत आहे तोंच तिचे भावी पति गदाधर पूर्ण चंद्राप्रमाणे अध्यात्मगगनाच्या शिखराप्रत आरोहण करीत होते. ‘न भूतो न भविष्यति‘ अशा प्रकारचा होता तो त्यांचा साधनाकाळ! देहभानाच्या सा-या सीमा ओलांडून असीमालाही ग्रासण्याच्या प्रयत्नांत होते ते!!

**दक्षिणेश्वरीं कालिमंदिरीं ज्वालामुखिच्या परी ।**
**विरहवन्हिचा डोंब पाजळे गदाधराच्या उरीं ।।**
**भावाग्नीच्या प्रखर जिभा त्या अंतरिं लखलखती ।**
**तयांत नकळत पडती भौतिक विषयांच्या आहुती ।।**
**विश्व ओसरे तृषा तरि तरि उरे देविदर्शनाची ।**
**दर्शनतोयें विरहाग्नीचा दाह शमविण्याची ।।**
**‘आई, आई!‘ हांक तयाची अग्निशिखेच्या परी ।**
**क्वचित् कुणाच्या स्पर्शुनी हृदया जाळें विव्हल करी ।।**
**परी जयां या देवशिशूचा दिव्य भाव नाकळे ।**
**ते व्यवहारी शाणे म्हणती, ’वेड यासि लागले’ ।।10।।**

आर्तस्वराने गदाधराने देवीला घातलेली ही साद कांहीं भाविक

श्रोत्यांचा जीव कालवून सोडी तर कांहीं इतरांना तें एक देवपिशाचें जीवघेऊ वेड वाटे. भावीक जन म्हणत,'ही देवी तरी कसची? अशा भक्ताला दर्शन नाहीं देत तर ती ते देणार तरी कुणाला? जी आपण आजवर मानीत आलों ती खरोखरच आहे कीं काय?' पण त्यांचा हा संशय फार काळ टिकत नसे. गदाधराचा झंझावाती भाव त्यास कुठच्या कुठें उडवून देई! त्यांचें मन लगेच त्यांस अंतरांतून ग्वाही देई,'जगदंबा नक्की आहेच! नपेक्षा हा तिचा बाळ एवढा जीव तोडून आक्रोश करतो कां? या देवशिशूची तळमळ हीच तिच्या अस्तित्वाची साक्ष!' अशा प्रकारें गदाधराच्या उत्कट भावाने भारावलेलें त्यांचें मन संदेहमुक्त होऊन स्थिरावे. त्यांचे नेत्र 'या देवीपुत्राच्या दर्शनाने आपण कृतकृत्य झालों' असें मानीत व आपली धन्यता व्यक्त करण्यास अश्रुधारा ढाळीत. परंतु इतर सर्व सामान्यांना मात्र, 'गदाधराला वेड लागलें खास', असेंच वाटे. त्याच्याविषयीं तें अनुकंपा दाखवीत. ही उपेक्षावजा अनुकंपा पाहून जे ख-या भक्तीचे भुकेले असत त्यांना मनस्वी दुःख होई. त्यांच्या उद्वेगाला शब्द फुटूं लागतः

**'धन्य धन्य ते जयां लागलें ईशभक्तिचें पिसें ।**
**संसाराच्या आसक्तीचा लवलेशहि ज्यां नसे ।।**
**ज्ञानरूप परमात्मचिंतनीं वसती नित ते कसे ।**
**सांग जडात्म्या विषयलंपटा दिसती तुजसी पिसे? ।।**
**कामिनिचे कुणि असति भुकेले कुणी कांचनाचे ।**
**कुणि कीर्तीचे कुणि विद्येचे भंगुर भोगांचे ।।**
**भिक्षुक सारे हे भवकीटा तुज वाटति मोठे ।**
**परि त्यां आत्मसुखाचा अनुभव अखंड तो कोठें? ।।**
**वेड समस्तां असे लागलें वेड कुणा तें नसे ।**
**परी धन्य जे देवासाठीं असतिल झाले पिसे' ।।11।।**

श्रीरामकृष्ण (गदाधर) परमेश्वराचे अवतार ना? मग त्यांना अशीं अध्यात्मिक जीवनाच्या इतिहासात अजोड असणारीं साधनें करण्याची आवश्यकता काय होती? असा प्रश्न अनेकांच्या मनांत डोकावणें शक्य आहे; पण तें 'अवतारांचें' रहस्य न जाणल्यामुळें. सामान्य जनतेसमोर आदर्श जीवन ठेवणें, आपण अनुभवलेलीं, आचरलेलीं तत्त्वें त्याच्या गळीं उतरविणें व तेणेंकरून त्यास पुर्णत्त्वाप्रत नेणें हेंच अवतारांचें मुख्य कार्य. हेंच त्यांचें धर्मसंस्थापन.

अवतार हे जीवंत वेद; बोलकीं उपनिषदें. त्यांची प्रत्येक कृति इतरांस उद्बोधक, मार्गदर्शक व्हावी अशीच असते. सर्व धर्मांच्या, सर्व मतांच्या लोकांनां, तसेच सर्व श्रेणींतील साधकांना त्यांचे जीवन अति उच्च, अति उदात्त, दिसावयास हवें. सर्वांच्या ठायीं त्यांनी आदर उत्पन्न करावयास हवा. उघडच आहे कीं हें साधण्यास त्यांच्यामधील सारेच अध्यात्मिक भाव पराकोटीला पोहचलेले असले पाहिजेत. तेंव्हाच ते सर्व स्तरांतल्या नी सर्व

प्रकारच्या मुमुक्षूंना पूज्य ठरतील. म्हणूनच गदाधराने जो जो भाव स्वीकारून साधना केली त्या त्या भावाची चरम सीमा त्याने गांठली. आपल्या साधनाविषयीं बोलतांना श्रीरामकृष्ण आपल्या भक्तांना सांगत, 'मी सोळा आणे केलें. तुम्ही एक आणा तरी करा.'

जगाच्या उध्दारासाठीं, अनेकांच्या पापविमोचनासाठीं, जन्म घेतलेल्यांना इतरांच्या अनेकपटीने साधने करावीं लागतील हें उघडच आहे. साधारण जीव आपल्या कर्मांमुळें, अतृप्त वासनांमुळें जन्म घेतो; आणि अवतार अनेक दुःखी-कष्टी जनांच्या आर्त हांकेस साद देण्यासाठीं देह धारण करतो. देही होऊन अनेकांच्या कारणास्तव अवतरतो. म्हणून त्याने केलेल्या साधनांत विविधता आणि काठिण्य हीं अवश्य दिसून येणार.

गदाधराची लोकबाह्य वागणूक व लोकातीत साधनें यांचें यथार्थ ज्ञान न झाल्यामुळें त्यांच्याविषयीं अनेक प्रकारचे लोकप्रवाद पसरूं लागले. कारण-

**जग हें विषयांचा बाजार । तेथें विषयपिसा येणार ।।धृ।।**
**विषयीं दृष्टि न जो कधिं फिरवी । विषय उभवि तिज मात्र आळवी ।**
**माल अव्हेरी मालका वरी । तो वेडा ठरणार ।।**
**मेळाव्यांत पिशांच्या ये जो । सूज्ञ असोनी पिसाचि ठरतो ।**
**तेंवि गदाईवरही होतो । निंदेचा भडिमार ।।**
**'गदाइची मति भ्रष्ट होउनी । फिरतो उघडा तो जनीं वनीं ।**
**आई नामें क्रंदत निशिदिनिं । उठवी हाहाक्कार' ।।**
**ऐशी वार्ता पडतां कर्णीं । विव्हल होई मा चंद्रमणी ।**
**'टाकूं याचें लग्न लावुनी' । करी असा निर्धार ।।**
**दारिद्र्याचा दोष लागला । तशांतही सुत वेडा ठरला ।**
**वधू कशी मग मिळे तियेला । होई माय लाचार ।।12।।**

माता चंद्रमणीच्या डोक्यांत विचारचक्र चालूं झालें. 'माझी सारी मदार ज्या मुलावर मी आजवर ठेवली, ज्याच्याविषयीं मला इतके शुभसूचक दृष्टांत घडले, ज्याच्या उज्ज्वल भवितव्याची मी स्वप्ने पाहीत राहिलें, ज्याच्यावरील श्रध्देचें कवच अंगी चढविल्यामुळें दारिद्र्याच्या निष्ठुर, नियतीच्या कठोर आघातांची मला मुळींसुध्दां कदर वाटली नांही तोच माझा बाळ आज वेडा होतो? केवळ अशक्य! ईश्वराची लीला अचिन्त्य, अतर्क्य म्हणतात! पण त्या ईश्वराला देखील कांहीं नियम पाळावेच लागतात! मर्यादा सांभाळाव्या लागतात. नाहीं तर व्यवहारांत कुठेंच संगति राहिली नसती. सत्कर्म, सदाचारादींना अर्थच राहिला नसता. नियमांना अपवाद असूं शकतील-नव्हे असतातही. पण हे अपवादसुध्दां काहीं नियमांना धरूनच असतात. असे नियम प्राकृत जनांना कदाचित् दिसणार नाहींत. प्रत्येक कर्माला कारण हें आहेच!-एवढें बरीक खरें, माझ्या गदाईच्या ठायीं लहानपणापासूनच देवधर्मादींची आवड, सांसारिक गोष्टींची घृणा वगैरे गुण

दिसून येत होते. म्हणून एवढ्यानें मनुष्य काय वेडा होतो? काय बाई! अत्यंत समंजस, तैल बुध्दीचा, आपल्या कला-नलकलादींनी लोकास रंजविणारा, माझा गदाई! एखाद्या माथेंफिरूसारखा वागतो, फिरतो म्हणे!

'तो कलकत्यास जावयास निघाला, तेव्हां गांवचे लोक किती हळहळले? त्यावेळीं मला वाटलें, मथुरेस निघालेला श्रीकृष्णच जणू गोप-गोपींचा निरोप घेत आहे.' पण–पण आईचेंच हृदय तें! किती काळ तें धीर धरणार? गदाईला चंद्रमणीने घरीं बोलावून घेतलें. कांहीं दिवसांत तिला कळून चुकलें की गदाईला वेडही लागलेलें नाहीं किंवा कांहींजण म्हणतात तशी भूतबाधा ही नाहीं. तिला वाटलें त्याला जडलेला हा वायूचाच विकार असावा.

गदाईस आराम पडावा म्हणून अनेक उपाय योजण्यांत आलें. पण ज्याला केवळ देवपिसेंच लागलेलें, त्याच्यावर या लौकिक उपायांची काय मात्रा चालणार?

अखेर प्रौढ व अनुभवी लोकांच्या सल्ल्यानुसार 'गदाईचें लग्न करावें' असा निर्णय घेण्यांत आला. पण नुसता निर्णय काय कामाचा? कोणतीही इच्छा फळण्यास तिच्या जोडीला स्वतःच्या ठिकाणचें ती साधण्याचें सामर्थ्य आणि परिस्थितीची अनुकूलता या दोन्ही गोष्टी असाव्या लागतात. त्यांच्या अभावीं, 'उत्पद्यन्ते विलियन्ते दरिद्राणां मनोरथाः।' असाच प्रकार व्हायचा. चंद्रमणीच्या बाबतींतही असेंच झालें. घरांत अठरा विश्वे दारिद्र्य आणि गावांत गदाईविषयीं प्रतिकूल लोकप्रवाद पसरलेले! अशा परिस्थितींत लग्न जुळणार कसें?

गदाईच्या थोरल्या भावाने आणि माता चंद्रमणीने प्रयत्नांची पराकाष्ठा केली; पण त्यांच्या वाट्यांस आली केवळ दारूण निराशा. चंद्रेला जीवन निराश वाटूं लागलें. तिचें काळीज फाटूं लागलें. अर्थातच चंद्रमणीचे हे सारे वधूशोधनाचे प्रयत्न गदाईच्या नकळतच चालले होते!

विरक्त गदाई लग्नाचा विषय काढतांच, बेचैन होणार, आपणास मना करणार. आत्तांशाच कुठें तो सुधारत आहे. निदान अशा वेळीं तरी असल्या बाबींची त्याच्याशीं वाच्यता न करण्यांतच शहाणपण आहे', अशा भीतीने चंद्रमणीने गुपचीप प्रयत्न चालविले होते. पण गदाईच्या सूक्ष्म अवलोकनांतून हें सर्व निसटूं शकलें नाहीं. जो सर्वांच्या अंतरांत नित्य साक्षीरूपाने राहातो त्याच्यापासून कोण काय लपवूं शकणार? गदाधर आईस म्हणाला–

**'आधिंच विधिने असति बांधिल्या वरवधुंच्या गांठी ।**
**जयरामवाटीमधें वसे जी विहिता मजसाठीं ।।**
**आई हे आयास सांड तूं वधू शोधण्याचे ।**
**रामचंद्रबाबूंची कन्या संकेतित मज असे ।।**
**तिच्या विना पाहणें वेगळी तुम्हा लागत नसे' ।**

**ऐकुनि वच हें पुत्राचें मनिं चंद्रादेवी हसे ।।**
**वधू लाभली गोड तान्हुली पंचवर्षबाला ।**
**अल्पाकारा विश्वाधारा वाटे चंद्रेला ।।13।।**

गदाधराने आपल्या लग्नाच्या सूचनेस हरकत घेतली नाहीं, एवढेंच नव्हे तर त्याने आपल्या भावीपत्नीचा स्थलनिर्देश करून विवाहाला अप्रत्यक्षरित्या अनुमती दिली आणि त्याविषयीं किंचित् उमेदही दाखविली. गदाधराला, लग्न ठरण्या अगोदरच, आपल्या सहधर्मिणीविषयीचें जसें अतींद्रीय ज्ञान झालें होतें, तसेंच सारदेला देखील, ती केवळ तीन वर्षांची असतांनांच, आपला पति कोण होणार याची कल्पना होती!

जयरामवाटीहून जवळच असलेल्या शिहोड नामक खेड्यांत, गदाधराचा भाचा हृदयराम याच्या घरीं, एक भजन-कीर्तनाचा कार्यक्रम ठेवण्यांत आला होता. या कार्यक्रमास तीन वर्षाची सारदा आपल्या आईसमवेत जयरामवाटीहून आली होती. स्त्रीपुरुषांचा बराच जमाव जमला होता. त्यांमधील पुरुषांकडे बोट दाखवून सारदेच्या नात्यातील एका बाईने सारदेला सहज कौतुकाने विचारलें,'सारू! एवढे लोक जमलेत ना; त्यांमधील कोणाशीं तूं लग्न करूं इच्छितेस?'

**नवरा तुज कोण हवा म्हणुनी पुसितां तिजला ।**
**सारु समकरां उचलुनि दावि गदाईला ।।**
**कीर्तनासि जन येती शिहड मंदिरीं जमती ।**
**परी तयांमधुनि सारु गदाइस वरी ।।**
**आधिंच जाणे गदाइ सारु स्वीय पत्नि म्हणुनि ।**
**सारुही तुरीय वर्षि गदाइस वरी ।।**
**शिव नि शक्ति एकच तीं भिन्न जरि अम्हा दिसती ।**
**शिवीं वसे शक्ति तशी शक्तितही शिव वसे ।।14।।**

गदाधराने आपल्या भावी पत्नीचें स्थळ दिव्य दृष्टीने पहावें आणि सारदेने देखील जणूं निरतिशय आदराने व प्रेमाने आपले दोन्ही हात उभारून गदाईच आपला पति असल्याचें सुचवावें, या गोष्टी त्यांच्या अलौकिक शक्तीच्या निदर्शक नव्हेत का? सारदेकडून आपल्या भावी पतीची झालेली निवड केवळ योगायोगानेच योग्य ठरली, असें मानणें सयुक्तिक दिसत नाहीं. कारण सारदेच्या इतर गुणांवरून, तिच्या ठायीं दिसून येणा-या अलौकिक शक्तीवरून, तिच्या आचारविचारांतून प्रकटणा-या दिव्य भावांवरून, तिचें आपल्या विवाहाविषयींचें भाकित अर्थपूर्ण होतें असें मानणेंच योग्य दिसतें. एखाद्या अल्लड मुलीने प्रौढ ज्ञानाच्या, प्रगल्भ विचारांच्या गोष्टी सांगितल्यास आम्ही त्या तिने कुणाकडून तरी ऐकलेल्या असाव्यात आणि त्यांची ती केवळ पुनरावृत्ति करीत आहे, स्वतःच्या बुध्दीने ती त्या सांगत नाहीं, असेंच अनुमान काढतों. पण ती मुलगी जर सूज्ञ, चिकित्सक व चाणाक्ष असेल तर तिचें आपण कौतुकच करतों. तें विचार

अन्य कुणाचे असावेत असें आम्हास सहसा वाटत नाहीं. सारदा इतर मुलींप्रमाणे नव्हती. तिची प्रत्येक कृति अर्थपूर्ण असून तिच्या अलौकिकत्वाची साक्ष देणारी होती. म्हणूनच तिचें पतिनिदर्शन हा तिच्या दिव्यज्ञानाचा आविष्कार असें मानणें आम्हास रास्त वाटतें.

अवताराचें मन हें विश्वमनाशीं नित्य निगडीत असतें. प्रत्येक व्यष्टिमनाशीं या विश्वमनाचा संबंध असतो. जसे शरीराच्या कोणत्याही ठिकाणीं होणा-या अनुकूल व प्रतिकूल संवेदना आमच्या मनाला जाणवतात, तशाच देवाचे अवयवभूत असे जे जीव, त्यांच्यात उठणा-या भावना देवाला-अवतारी पुरुषाला-जाणवतात. अतींद्रिय ज्ञान हें अशा प्रकारचें असतें. श्रीरामकृष्ण व श्रीसारदादेवी यांच्या जीवनांत पावलोपावलीं आम्हाला या सिध्दांताची प्रचीती घडते. अवताराचें मन हें सर्व मनांचें मन. आपली माया (शक्ति) सर्व भूतमात्रांचा जीव (आधार) होय असें भगवान गीतेंत सांगतात (जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत्। भ.गी. अध्याय 7, श्लो.05)

गदाधराने दाखविल्या ठिकाणीं वधू सांपडली. यावेळीं गदाधर तेवीस वर्षांचा आणि मुलगी (सारदा) पांच वर्षांची. वयाच्या दृष्टीने वधू विजोड दिसली तरी अन्य बाबतींत गदाधराला ती अनूरूपच होती.

एकदाचें लग्न झालें. वधू आणि वर या दोन्ही पक्षांची सांपत्तिक स्थिती हालाखीची. 'लक्ष्मीसारखी पोर घरीं आणतें आणि लग्नसमारंभाच्या दिवशीं तरी तिच्या अंगावर चारदोन दागिने नकोत का घालायला?' असा विचार करून चंद्रमणीने शेजारच्या एका जमीनदाराकडून कांहीं दागिने उसने आणले होते. समारंभ संपून ते आतां परत करण्याची वेळ येऊन ठेपली. पण मनकोवळ्या चंद्रमणीला सारदेच्या अंगावरून दागिने उतरविणें शक्य होईना. तिचें काळीज कापूं लागलें. नेत्र ओलावले. हात गळूं लागले. दागिने तर परत केलेच पाहिजेत. पण ते कोवळ्या सुनेचें निष्पाप मन न दुखवितां. हें व्हावें कसें? हें कठोर कर्म करावें कुणी? चंद्रेच्या मनांत असे विचार कालवूं लागले. तें पाहून गदाधर मातेस म्हणालाः

**धर्म करूं लावि कर्म कटुहि जीवनीं । परि स्वधर्म नये सांडुं कधींही कुणी ।।**
**कान्चनाची अकिंचना आस ती नको।तृप्तिभूषणेंहि मात्र नित्य मन सजो ।।**
**सुवर्णीं न सक्त बाळ अल्पवयी तें । निद्रित असतां काढूं अलंकार हे' ।।**
**भूषणें तीं गदाधरें सर्व काढलीं । चंद्रमणी माउलीस स्वयें अर्पिलीं ।।15।।**

गदाधराने आपली अल्पवयी पत्नी झोपीं गेली असतां तिच्या अंगावरून सारे उसने आणलेले दागिने काढून ज्याचे त्यास परत करण्यासाठीं आपल्या आईच्या हवालीं केले. आपल्या डोळ्यासमक्ष हें कठोर(?) कृत्य घडत असतां माता चंद्रमणीच्या काळजाला चटके बसल्यांवाचून राहिले नाहींत. पण पुढें आपल्या देवीतुल्य सुनेला सुखाने घरांत नांदतांना पाहून तिला आपल्या सा-या दुःखाचा विसर पडला. चिदानंदमूर्तीच्या लीला पाहतांना चित्ताला दुःख कसें जाणवणार?

चिरविरहानंतर भक्ताचें हृदय देवदर्शनानें फुलून निघावें तसेंच तिचें निघालें. ती स्वतःशींच म्हणतेः

**सदनीं आली मम पार्वती ।।धृ।।**
**उदरीं माझ्या गदाइ असतां । देवदर्शनें विविधहि होतां ।**
**होत असे जें सुख मम चित्ता । अनुभवितें तें अतां ।।**
**देवचक्षु पाहिले अजवरी । सारे सुंदर तेजस्वि जरी ।**
**नयन इयेच्या चक्षुंच्या परी । कधीं न म्यां पाहिले ।।**
**सेवाभक्ती जणुं साकारलि । अखिल जगाची हीच माउली ।**
**जगदंबेची शांतिसाउली । धामीं मम पातली ।।**
**दिव्य गुणांची बालिकेचि या ।व्यर्थ विटाळूं कशासि काया ।**
**लोभमोहप्रद स्वर्णभूषणां । घालुनियां तिजला ।।16।।**

सारदेच्या अंगावरील दागिने ज्या दिवशीं काढण्यांत आले त्याच दिवशीं तिचे काका कामारपुकूरीं आले. आपल्या डोळ्यांवर विश्वास बसेना. सारी गोष्ट समजतांच अनावर रागाने सारदेला घेऊन ते जयरामबटीस परतले.

झाल्या गोष्टीमुळें चंद्रमणी फार अस्वस्थ झाली. पण गदाधराने तिची समजूत काढली. तो म्हणाला, ‘लग्न तर होऊन गेलें. आतां तें काय थोडेंच बदलतां येणार!‘

विवाहानंतर एका वर्षाहून अधिक काळ गदाधर कामारपुकूरांत राहिला. सारदेला आतां सहावर्षें संपून सातवें लागलें आणि कुलरिवाजाप्रमाणे पत्नीस जोडप्याने घेऊन येण्यासाठीं गदाधर सासुरवाडीस गेला. तेव्हां सात वर्षाच्या सारदेने कुणीही न सांगतां, आपण होऊनच केलेली आपल्या पतिदेवांची सेवा अत्यंत अद्‌भुत व अपूर्व होती असें सांगण्यांत येतें. अवतारी पुरुष जन्मापासूनच पूर्ण व निर्दोष असतात असें म्हणतात ना? याची पुरेपूर साक्ष श्रीसारदादेवींच्या जीवनांत आम्हाला मिळते. तिच्या प्रत्येक कृतींतून, हालचालीतून, पूर्णत्वाचा आविष्कार होत असे.

सारदेचें लग्न होऊन आतां पुरीं सात वर्षें उलटलीं. ती आता तेरा वर्षांची. आपल्या आप्तेष्टांच्या इच्छेनुसार ती कामारपुकूरला आलेली आहे.

या काळांत, कामारपुकूरीं असतां, तिला रोज एक विलक्षण अनुभव येई. रोजच्या आंघोळीसाठीं, घरापासून ब-याच अंतरावर असलेल्या हळदापुकूर नामक तलावावर तिला जावें लागे. स्वभावतःच लाज-या अशा सारदेला एवढ्या दूर एकट्याने जाण्याची भीती व संकोच वाटे. घराच्या मागल्या दरवाजाआड उभी राहून कोणी सोबत मिळेल का म्हणून ती डोकावून पाही आणि तोंच-

**समवयी बाला आठ तेथें येती । संगें स्नाना जाती सारदेच्या ।।**
**हळदापुकूरीं करोनी मज्जन । येती परतोन सारूसंगें ।।**

**अंतीं सारदेला उमज पडला । संगें येत होत्या अष्टनाईका ।।17।।**

ज्याप्रमाणें सामान्य मनुष्याच्या शरीराचे अवयव त्याच्या इच्छेनुसार कर्म करून त्याची सेवा करावयास सदैव सज्ज असतात त्याचप्रमाणे ईश्वरावताराच्या अवयवभूत अशा विश्वांतर्गत सर्व शक्ति त्यांचे कार्य साधण्यास-इच्छा पूर्ण करण्यास-तत्पर राहतात. ईश्वराचें मन हें जणूं जगांतील अखिल शक्तींचें (universal forces) केंद्र. या मनाचे धागेदोरे सा-या विश्वाला व्यापून सर्व जीवांच्या अंतराशीं निगडीत झालेले असतात.

सारदेसमवेत जाणा-या अष्टनायका म्हणजे श्रीकृष्णाच्या आठ आवडत्या पत्न्या-रुक्मिणी, सत्यभामा, जांबवंती, सूर्यकन्या कालिंदी, अवंतिराजसुता, मित्रवृंदा, यज्ञजितकन्या याज्ञजिती, कैकेयनृपकन्या भद्रा आणि महेंद्रनाथकन्या लक्ष्मणा होत. या सर्वजणी सूक्ष्म जगतांतील देवता असून परमात्म्याच्या शक्ति-सारदादेवींची प्रभावळ-होत.

या घटणेविषयीं किंचित् विचार करतां आमच्या सहज लक्षांत येईल कीं श्रीसारदादेवी या स्वतः विष्णूची मुख्य शक्ति, महालक्ष्मी असून जगतांत राहून त्यांस नित्य सहचर्य देणा-या आणि अडलेपणीं बाह्य स्थूल सृष्टींत प्रकटून त्यांना मदत करणा-या देवता होत. दिव्याचें बटण दाबतांच दिवा पेटावा तद्वत् सारदादेवींच्या मनांत तीव्र इच्छा होतांच या देवता साकारून तिला सामो-या होत असत. हें नियमास धरूनच आहे. श्रीमाताजींना उद्देशून श्रीरामकृष्ण म्हणत असत,'ती लक्ष्मी आहे', 'ती माझी शक्ति आहे'. श्रीरामकृष्णांचें हें वचन खोटें ठरणें संभवेल काय?

या नंतर थोड्याच दिवसांत गदाधर दक्षिणेश्वरीं आला आणि सारदा माहेरी जयरामबटीस परतली. यावेळीं पुनश्च गदाधराने आपल्या प्रखर साधनांस प्रारंभ केला. नाना धर्मांतील व पंथांतील, कठोर साधनें केल्यामुळें त्याची मुळची दणकट प्रकृति पार ढासळून गेली. एका पंथातील साधनें संपतांच दुस-या मार्गाचें गदाधर अवलंबन करी. सर्वांचा देव म्हटल्यानंतर तो सर्वमार्गप्रकाशच असला पाहिजे. अगोदरचे सर्व धर्ममार्ग चुकीचे म्हणून नूतन धर्माच्या प्रतिष्ठापनेसाठीं आलेला हा देवावतार नव्हता. हा सर्व धर्मांस चैतन्य देण्यास, सर्व मतांना पुष्टि देण्यास आलेला देवाधिदेव होता. म्हणूनच त्याने विविध प्रचलित धर्मांस ओज आणलें. प्रत्येकामध्यें आपला धर्म आपणांस अंतिम ध्येयाप्रत नेण्यास समर्थ आहे असा विश्वास जागृत केला. जें या अगोदर कोणीही करूं धजलें नाहीं तें त्यानें करून दाखविलें! निर्गुणाचें स्वरूप जसें अगम्य तशीच या सगुणाची लीलाही अगाध. दोघेही मनवाचातीत!!

गदाधराने जीं साधनें केलीं तशीं इतर कोणी करूं जाता तर त्याच्या शरीराच्या चिंधड्याच उडत्या. विशेषतः त्याचें पुरे सहा महिने निर्विकल्पावस्थेंत राहणें, अतिघोर तांत्रिक साधना करणें, राधाभावांत असतांना लोकविलक्षण अभूतपूर्व असे शरीरविकार अनुभविणें या गोष्टी

मानवी इतिहासांत अजोड राहिल्या. हेंच या सगुणाचें निर्गुणत्व; सगुण असून गुणातीत असणें.

हीं अतिमानवी साधनें, हा गदाधराने स्वीकारलेला पार्थिव मानवी देह पेलूं शकणार कसा? त्याच्यावर व्हायचे ते अनिष्ट परिणाम झालेच. अजून तो तगला हेंच मुळीं आश्चर्य!

थोडेसें तरी शारीरिक स्वास्थ लाभावें म्हणून गदाधर कामारपुकूरीं, आपल्या घरीं आला. सारदेलापण त्यानें बोलावून घेतलें. अंतरांत संन्यस्त वृत्ति ठेवून, आदर्श गृहस्थाश्रमांतील आदर्श पतीचें आपल्या पत्नीविषयीचें कर्तव्य पाळण्यास, आपल्या भारतीय संस्कृतीचीं मूलतत्त्वें तिच्यामध्यें बिंबविण्यास व तिला आदर्श गृहिणी बनविण्यास गदाधराने सारदेस कामारपुकूरीं आणलें.

ब्रह्माच्या अधिष्ठानावरच संसाराची उभवट झाली पाहिजे. ब्रह्मदृष्टि ठेवून, अद्वैतभावांतून सारा व्यवहार करावयास हवा. हाच भारतीय संस्कृतीने आम्हापुढे ठेवलेला आदर्श. पण असें उच्च ध्येय आध्यात्मिक शिक्षणावांचून, अहर्निश प्रयत्नाविना साधणें अशक्य. ब्रह्मकारवृत्तींतून सर्व कर्में करणें आणि इतरांस तीं तशीं करण्यास लावणें हेंच भारतीय संस्कृतीचें ध्येय. या ध्येयास धरून आपल्या पतिधर्माचें पालन करण्यासाठींच गदाधराने सारदेला आपल्यापाशीं बोलावून घेतलें आणि आपलें कर्तव्य अत्यंत चोखपणें पार पाडलें. आपल्या पत्नीला ब्रह्मानंदपदीं चढविलें. स्वानंदसाम्राज्याची तिला सम्राज्ञी बनविलें. याहून अधिक कोणताही पति आपल्या पत्नीसाठीं काय करूं शकेल?

आपल्या पतीविषयीं श्रीसारदादेवी आपल्या शिष्यांना सांगतः-

**‘वेदमूर्ति यती स्वयें शिकवीती । व्यवहारनीती मंत्र तंत्र ।**
**ज्ञान परापर अर्पिती सादर । बोल ते अमर वसती ऊरीं ।**
**अंतरीं हेलावे मोदकुंभ सदा । कोण त्या आनंदा शके वर्णू ।**
**गोड ती संगती गोड त्यांची स्मृती । आदर्श ते पति सच्चिद्‌रूप‘ ।।18।।**

कामारपुकूरहून सारदा जयरामबटीस आली आणि गदाधर पुनश्च दक्षिणेश्वरीं परतला. यानंतर पुरीं चार वर्षें लोटलीं. या अवधींत गदाधराने आपल्या पत्नीची काहींही विचारपूस केली नाहीं. कामारपुकूरच्या आपल्या पतीदेवांच्या संगतींत अनुभविलेला तो अवर्णनीय आध्यात्मिक आनंद सारदेला क्षणोक्षणीं जाणवत होता. पतिदेवांची प्रेमळ वर्तणूक ती विसरूं शकत नव्हती. पण तिच्या या आनंदानुभूतींत बिघाड आला; आणि तो एका चिंतेमुळें! ‘माझ्या प्रेमळ पतींचें एकही पत्र नाहीं, तें कां? ते मला विसरलेत का?‘ ही हुरहुर तिला सारखी बोंचत होती. त्याचबरोबर तिच्या कर्णी पतीविषयीं अनेक लोकप्रवादही पडत होते. ते टाळणें तिला शक्य नव्हतें. ’गदाई उघडा नागडा फिरतो. अल्ला नावाचा जप करतो! भंग्यासारखा शौचकूपें साफ करतों!’ वगैरे, वगैरे. या कथा सारदेचा जीव कालवून

सोडीत. या गोष्टी अंशतः अतिरंजित आणि अंशतः असत्य स्वरूपाच्या असत. कांहीं बायकांना तर नक्राश्रू ढाळीत, उसासे टाकीत, या गोष्टींचा सारदेला त्या ऐकण्यांत येतील अशा बेताने, वारंवार उल्लेख करण्यांत-सारदेला डिंवचण्यात, हिणवण्यांत-धन्यता वाटे. 'साधूनां दुर्जनाद्‌भयं' म्हणतात तशी सारदेला या बाया दिसतांच एक प्रकारची भीती वाटे.

ही बायकांची बोचणी टाळण्यास व अंतरींची तळमळ शमविण्यास दक्षिणेश्वरीं पतिदेवांच्या सान्निध्यांत राहून त्यांची सेवा करावी, प्राप्त परिस्थितींत हेंच आपलें कर्तव्य होय, असें मानून सारदेने दक्षिणेश्वरीं जाण्याचा निश्चय केला. आपला बेत तडीस नेण्यास तशी संधीही तिला प्राप्त झाली.

याच सुमारास गांवातील कांहीं स्त्रियां गंगास्नानासाठीं दक्षिणेश्वरीं जाणार होत्या. सारदेला ही एक देवदत्त संधी वाटली. तिने आपला गंगास्नानासाठी जाण्याचा मानस आपल्या पित्याकडे व्यक्त केला. पित्याने सर्व कांहीं ओळखून आपण जातीने तिला सोबत देण्याचें आश्वासन दिलें व सारी मंडळी दक्षिणेश्वरास निघाली. वाटेंत एक अद्‌भूत घटना घडली-

**पतिसदना चालली सारदा स्वीय पित्या सांगाती ।**
**चिंता झांकळते उरिं मोदा अभ्रें चंद्रा जशीं ।।**
**शीण न साहे तिला चालतां गात्रें जर्जर होती ।**
**अंगि भरे ज्वर पथीं दिसे घर जाववे न तिज पुढतीं ।।**
**धर्मालयिं त्या अंग टाकुनी झोपिं जाइ सारदा ।**
**काळीभोर सुरम्य अंगना ये तिजजवळी तदा ।।**
**जगावेगळें तेज तिचें ती सारदेसि गोंजारी ।**
**मृदु शीतल त्या स्पर्शें होई बरी सारु सत्वरी ।।**
**पुसे सारदा, 'कोण कुठुनि तूं आलिस मम शेजारीं?' ।**
**'बहिण तुझी मी' म्हणे, 'वास मम असे दक्षिणेश्वरीं'**
**स्वप्न संपलें, ज्वर ओसरला बरी सारु जाहली ।**
**चालुं लागली वाट आपुली पतिसन्निध पातली ।।19।।**

सारदेचा पतिविरहाने होरपळलेला जीव स्वप्नांतल्या कालीदर्शनाच्या अमृतसिंचनाने फुलून निघाला. तिचा ज्वर गेला. कालीमुख पाहिल्याने पतिमुख पाहिल्याचें सुख तिला लाभलें. तिच्या दृष्टीने दोन्हीही एकच होतीं.

पित्यासमवेत सारदा पतिनिवासीं पोंचली. शिवपार्वतीचें भूतळीं मीलन झालें. मीलन कसलें? ज्यांच्या वियोग कधींच होत नाहीं अशा शिवशक्तींचा तो संयोग होता! नव्हे; ती होती केवळ आत्मारामाची आत्मक्रीडा!!

बराच काळ हें आदर्श जोडपें एकत्र राहिलें; आणि तें या जगांतील समस्त जोडप्यांना खरा आदर्श दाखविण्यासाठीं. संसारांत असून संसारी न

झालेलें हे जोडपें! ज्याच्या तेजाने जळून गेलेल्या कामदेवाचें भस्मसुध्दा जळून नाहींसें झालें, असें हें जोडपें! शिवपार्वतींनी मानव होऊन असें दिव्य केलें व स्वतःच स्वतःवर मात केली!

गदाधर व सारदा कित्येक महिने एकत्र नांदत होतीं. एकाच शय्येवर झोपत होतीं; आणि एकरूपच झालीं होतीं! त्यांच्यांतला दुजाभाव पूर्णपणें हरपल्यामुळें त्यांच्यात कामोद्भव होणें शक्यच नव्हतें–

**विरक्त दोघेही दोघे आत्मरत । तयां कैची प्रीत संभोगाची! ।**
**दीपा सेवी वात प्रकाश फांकण्या । तैसी रामकृष्णा सारदाही ।।**
**विवेकाचें लग्न विरक्तिशीं होतां । विरक्ति सेवीते ज्ञाना सदा ।**
**काय समागमें उद्भवे तयांच्या । संभोगाची इच्छा कामयुक्त? ।।**
**विरक्तांचा राजा पुसीतो पत्नीतें । 'लग्न या देहाचें तुजसी झालें ।।**
**असतां तुझा या हक्क देहावर । पोंहचे खरोखर मान्य मज ।।**
**म्हणोनी मी सांसारिकापरी संग । करावा का सांग तूज संगें? ।।**
**लैंगिक वासना बरी नव्हे कोणा । परी पतिधर्मा पाळीन मी' ।।**
**आश्वासोनी म्हणे सारदा पतीतें । 'आवडे तुम्हा जें तेंचि घडो ।।**
**न मी कामकामी वास आत्मारामीं । तुम्हामध्यें स्वामी माझा असो ।।**
**स्पर्शन स्मरण चिंतन सेवन । सर्वेंचि मीपण माझें तुम्ही ।**
**होऊनी राहतां तेथें कामा स्थान । कैसें वा कोठून उरे नाथा? ।।20।।**

त्याग सेवा व प्रीती हींच कोणत्याही धर्माचा वा संस्कृतीचा गाभा आहेत. या तत्त्वांवर जी संस्कृति आधारलेली नाहीं ती कदापीही फार काळ तगूं शकणार नाहीं. त्याग प्रीतीचा आत्मा असून सेवा हें तिचें शरीर आहे. कोणत्याही धर्मसंस्थापकाच्या अंगी हे तीनही गुण उपजतच असावे लागतात आणि श्रीसारदादेवींचा जन्म म्हणजे या तिहींचा आविष्कार. श्रीरामकृष्णांच्या संगतींत या तिच्या गुणांना केवळ उजाळा मिळाला आणि तिचा स्वाभाविक प्रेमभाव सर्वात्मभावांत परिणत झाला. कारण या 'देवोदेवींचा' संबंध अगदींच आगळ्या स्वरूपाचा होता! श्रीरामकृष्ण सारदादेवीचा आत्मा आणि श्रीसारदा श्रीरामकृष्णांचा आत्मा, असें यांचें नातें! सारदा श्रीरामकृष्णांना साश्रात् कालीच मानी; आणि श्रीरामकृष्णांनी तर देवीज्ञानानें सारदेची शोडषोपचारें पूजाही केली; आणि आपल्या सा-या तपश्चर्येचें फळ तिच्या चरणीं अर्पिलें! त्याची कथा अशी.

।। तो होता जेष्ठ आमावस्येचा दिवस. 1872चा मे महिना।।. यावेळीं श्रीसारदादेवी 18 वर्षांच्या. श्रीरामकृष्णांच्या संगतींत त्या आतां एक वर्षाहून अधिक काळ राहत होत्या व त्यांच्या दैवी गुणांचा श्रीरामकृष्णांना पूर्ण परिचय झाला होता. 'गुणी गुणं वेत्ति न वेत्ति निर्गुणः । बली बलं वेत्ति न वेत्ति निर्बलः ।।' या उक्तीप्रमाणें सारदादेवींचें मोठेपण जाणायला रामकृष्णच हवे होते; आणि त्यांनींच तें जाणलें!

श्रीरामकृष्णांनी फलहारिणी कालीपूजेच्या दिवशीं देवीज्ञानाने

श्रीसारदामणींची पूजा केली. तंत्रमंत्रांत सर्व स्त्रियांमध्यें जगदंबेलाच पाहणें हें अन्तिम ध्येय मानण्यांत येतें. श्रीरामकृष्णांनी सुध्दां हें ध्येय साधण्यासाठीं व आपल्या सा-या साधनांच्या पूर्ततेसाठीं, ही अर्चा आपल्या सहचरीच्या चरणकमलीं अर्पिली आणि आपल्या सा-या आध्यात्मिक शक्तीची गंगा तिच्यांत अवतीर्ण केली-नव्हे, या सिध्दांचाच नैवेद्य तिला दाखविला.

गंगासागरांत गंगा विलीन होते तद्वत् पूजकाने आपल्या पूज्य दैवतांत एकरूप होऊन जावयांस हवें. यासाठीं त्यास आपल्या पूजेचा, सर्व साधनांचा, कर्मांचा आणि अहंत्वाचाही नैवेद्य देवाला दाखवावा लागतो. भगवंतानें दिलेल्या शक्तीने नी बुध्दीने आपण पूजादी सर्व क्रिया करतों ना? म्हणूनच शास्त्र असें आत्मनिवेदन करावयास आम्हास सांगतें. 'ईशावास्यमिदं सर्वम्' हें उपनिषद्वाक्य आमच्यां धार्मिक शिकवणीचें सार आहे. रामकृष्णांनी केलेल्या पूजेचें लोक असें वर्णन करतातः

**विविध धर्मपथ उजळी धर्मदीप जो । सारदेसमोर जेष्ठ अवशि तेवतो ।।**
**सर्वरूप सर्वात्मा स्वयें आचरी । साधनें समस्त शास्त्रिं असति वर्णिलीं ।।**
**मंथुनि साधनासागर सुधा काढितो ।पूजुनि निज कान्ते ती अन्तिं अर्पितो ।।**
**षोडशिभावें अर्चितसारदामणी ।विश्वमातृपदिं चढली पूजितां क्षणीं ।।21 ।।**

अतीव सालस, अत्यंत लाजाळू आणि अहंतेचा लवलेशही नसणा-या, देवज्ञानाने आपल्या पतीकडे पाहणा-या, श्रीसारदादेवी श्रीरामकृष्णांकडून खुणावल्या जातांच चौरंगावर बसल्या कशा? त्यांच्याकडून पूजा स्विकारूं शकल्या कशा?' वगैरे गोष्टींचा उलगडा होणें कठीण. आपल्या भारतीय संस्कृतीस तरी या गोष्टी मान्य नसणा-या दिसतात. पुरुषोत्तमाने देखील मर्यादा मोडूं नयेत, असेंच आपल्याला वाटतें; आणि तें एका दृष्टीने योग्य पण आहे. कारण जेष्ठ-श्रेष्ठांनीच समाजाचे बंध पाळले नाहीं तर त्यांचें अनुकरण करणा-या सामान्य जनतेच्या राहणींत बेजबाबदारपणा वाढेल, समाजांत उच्छृंखलपणा माजेल आणि अवतारांच्या कार्यालाच आळा बसेल. हें सर्व खरें; पण हा झाला एकांगी दृष्टिकोन. सर्व-सामान्यांस व्यवहारिक दृष्टीच्या अतीत नेऊन पारमार्थिक सत्याचा साक्षात्कार घडविणें हें अवताराचें मुख्य कार्य; आणि हें साधण्यास अवतारास आपण स्वीकारलेल्या सीमा कांहीं वेळां दूर साराव्या लागतात. त्यांचा देह म्हणजे देव आणि मानव या दोघांचीही क्रिडाभूमी.

ईश्वर जेव्हां अवतार घेतो तेव्हां तो आपला ईश्वरभाव पूर्णपणें झुगारीत नाहीं. आपल्या ईश्वरत्वाची, आपल्या दिव्या भावाची जाणीव ठेवूनच तो जीवभावांत वावरतो. त्यांच्यात जणू दोन व्यक्ती असतात. कधीं तो दिव्य भावातून लीला करतो, तर कधीं तो प्राकृत मानवाप्रमाणे वागतांना दिसून येतो. इवल्याशा कारणाने देखील त्यांच्यांतील जीवभाव अविर्भूत होऊन तो देवरूपेंच उरतो. श्रीरामकृष्णांचा आदेश होतांच

श्रीसारदादेवीमधील दिव्यभाव जागविला गेला. किंबहुना अहंकाररहित, खऱ्या शिष्याप्रमाणें त्या लज्जा, घृणा, भय इत्यादी अष्टपाश टाकून गुरुआदेश पाळण्यास सज्ज झाल्या. कोणतेंही मोल देऊन, वाटेल तो त्याग करून गुरु आज्ञा पाळलीच पाहिजे अशी शास्त्राचीच शिकवण नाहीं का? गुरूकडूनही पूजा स्वीकारण्यांत सारदादेवींचा उध्दटपणा नव्हता. आपण आपल्याहून श्रेष्ठ माणसाकडून पूजा, सेवा स्वीकारीत नसतों, कारण त्यामुळें, आमचें बुरें होईल ही भीति आपल्याला असते; पण ज्यांचें 'मीपणच' गळलें आहे, त्यांना अशी भीति वा दुजाभाव कोठून असणार? शिवाय, मूल आईला उचलून घेऊं देतें, आपली सेवा करूं देतें; तिचें नाक धरून ओढतें. त्यांत मुलाचा उध्दटपणा आहे काय? तसेंच येथें सारदेचें झालें.

शिष्याचा शिष्यभाव हरपला, तो शिवभावापन्न झाला, म्हणजे गुरूसुध्दा जीवभावांतून त्याची पूजा करतो. त्यांत आक्षेपार्ह असें कांहींच नाहीं. तसेंच हें सारदा-रामकृष्णांचें झालें. अखेर, पूजेअन्ती, दोघेही देवरूपेंच राहिले. शिवशक्तिसंयोग झाला.

अवतारांतच नव्हे, सामान्य मानवांच्या शरीरांत देखील, जीव आणि शिव दोघेही असतात (द्वा सुपर्णा सयुजा समानं वृक्षं परिषस्वजाते-मुंडक उपनिषद्); पण सामान्य माणसांच्या बाबतींत शिवभाव मायेने व्याप्त झालेला-आच्छादित झालेला-असतो आणि आमरण ते अशाच अवस्थेंत राहतातही. सामान्य माणसांची बुध्दि अज्ञानाने झांकलेली असते. ते अज्ञानाला वश होऊन वागतात. या उलट अवतारांच्या बाबतींत त्यांनी स्वीकारलेलें अज्ञान अति विरल असतें. जसें आपण पांघरूण घालून घेतों किंवा तें वाटेल तेव्हां सारून देतों, त्याप्रमाणें अवतारी पुरुष अज्ञानाचें पटल वाटेल तेव्हां दूर करूं शकतात! शिवभावांत राहूं शकतात. त्यांचा जीवभाव लटकाच असतो. सर्वसाधारणपणें आम्ही स्वप्नांतून जागृतात येतों तद्वत ते जीवभावांतून शिवभावांत येतात. तशाच प्रसंगीं स्वेच्छेने देखील ते शिवभावापन्न होतात. स्वप्नांवर आमचा पूर्ण ताबा नसतो खरा पण तें किंचित् काळ टिकणारें, भंगुर असतें. तसाच अवतारांचा जीवभाव. जीवभावांत असतांना ते सामान्या माणसाप्रमाणें हसतांरडतांना दिसतात; पण तें किंचित् कालच. श्रीरामचंद्र सीतेसाठीं नाहीं का रडले? पण हें सारें लटकें. हा त्यांचा स्थायीभाव नव्हे.

श्रीमद्भगवद्गीता आम्हाला आमचें जीवन 'यज्ञमय' करायला सांगते. 'यज्ञ' हा शब्द 'यज्' या संस्कृत धातूवरून आलेला आहे. 'यज्' या धातूचे मुख्य तीन अर्थ होतात. 1. पूजा करणें (पूजन) 2. त्याग करणें आणि 3. प्रेम करणें (संगतीकरण). एकमेकाविषयीं आदर ठेवणें, एकमेकांसाठीं त्याग करणें व एकमेकांवर प्रेम करणें हाच यज्ञ. असा यज्ञ हा 'इष्टकामधुक्' सर्व कामना पूर्ण करणारा आहे असें गीतेंत भगवान म्हणतात.

रामकृष्णसारदेचें जीवन असें यज्ञमय होतें. त्यांची कोणतीही क्रिया

स्वार्थाने प्रेरित झालेली नव्हती. कामगंधहीन प्रेमाचा, सर्वभूतमात्रांकडे ईश्वरज्ञानाने पाहण्याचा व लोकहितास्तव राबण्याचा असा थोर आदर्श जगांतील कोणत्याच दांपत्याने आजवर आम्हापुढें ठेवलेला आम्हास दिसून येत नाहीं. रामकृष्ण काय किंवा सारदा काय यांपैकीं कोणाच्याही सान्निध्यांत येऊन माणसाच्या मनांत पालट घडून आला नाहीं किंवा त्याला दिव्यत्व प्राप्त झालें नाहीं तरच आश्चर्य!

मााताजींच्या जीवनांतील असाच एक प्रसंगः एकदां कामारपुकूरहून कांहीं स्त्रिया गंगास्नानसाठीं कलकत्यांस निघणार होत्या. त्यांच्याबरोबर आपला पुतण्या शिवराम व पुतणी लक्ष्मी यांना घेऊन आपणही जाण्याचें सारदादेवींनी ठरविलें. सगळी मंडळी पायींच निघाली. पल्ला बराच लांब होता. बरेंच अंतर चालून गेल्यावर सारदादेवी शिणल्या. त्यांच्या पायांत त्राण राहिला नाहीं. तरीपण त्या जीवतोडून चालायला लागल्या. मार्ग अत्यंत धोक्याचा; चोरलुटारूंच्या प्रदेशांतला. सूर्यास्तापूर्वी मंडळींना तारकेश्वरला पोंचायचें होतें. आपल्या एकटीसाठी सर्वांचेच जीव धोक्यांत पडूं नयेत म्हणून सारदादेवींनी आपल्यासाठीं न थांबतां पुढें जाण्यास मंडळीस सांगीतलें. अनुज्ञा होतांच, 'हिच्या नादीं पडतां आम्हां सर्वांचेंच मातेरें होईल' या भीतीनें, सारी मंडळी सपासप वाटचाल करीत थोड्याच अवधींत सारदादेवींच्या दृष्टिमर्यादेपलीकडे पोंचली.

सूर्यास्त झाला. संध्येचे पट आकाशांत पसरूं लागले; आणि अत्यंत अवघड कामें लीलेने करणा-या, इतर कोणत्याही स्त्रीहून अधिक राबणा-या, यौवनसम्पन्न लारदादेवी मात्र दरोडेखोरांच्या माळरानांतून गलितगात्र होऊन पाय रेटीत चालत होत्या. इतर मंडळीनी धोक्याचें माळरान कधींच पार केलें. एवढ्यात, हातीं जाड काठी घेतलेला, काळा कुळकुळीत असा एक धिप्पाड धटिंगण काळोखातूंन आपल्याकडे येत असल्याचें सारदादेवींना दिसलें. तो कर्कश आवाजांत कडाडला, 'कोण आहे तेथें अशा वेळी?कुठें चाललींस तूं?' 'पूर्वेस' सारदादेवी म्हणाल्या. 'हा पूर्वेस जाणारा रस्ता नव्हे. तो जातो पूर्वेला.', धटिंगण लुटारू गरजला. माताजी स्तब्ध उभ्या होत्या.

लुटारू किंचित् पुढें सरकला व माताजींचा चेहरा निरखून पाहूं लागला. पाहतां पाहतां त्याच्यात एकाएकीं फरक पडला! त्याची वागणूक पूर्ण बदलली!! तो सारदादेवींना म्हणाला, 'भिऊ नकोस. माझ्या मागून एक स्त्री येत आहे.'

एवढ्यांत माताजींना एक स्त्री आपल्या दिशेनें येत असलेली दिसली. त्यामुळें त्यांना किंचित् धीर आला. श्रध्दा भरल्याआवाजांत त्या दरोडेखोराला म्हणाल्या,'बाबा! माझ्या सोबत्यांनी मला मागें टाकलें; नी मला वाटतें मी वाट देखील चुकलें असेन. दक्षिणेश्वरीं काळीमंदिरांत तुमचे जामात राहतात. तेथें तुम्ही मला पोंचवाल तर मजवर फार उपकार होतील.' इतक्यांत दरोडेखोरपत्नी तेथें पोहोंचली. लडिवाळपणे तिचा हात

धरून सारदामणी तिला म्हणाल्या, 'आई! मी तुझी लेक सारदा. माझे सोबती मला मागें टाकून गेल्यामुळें मी मोठ्या संकटांत सापडलें होतें. माझे नशीब उघडलें आणि तूं नि बाबा मला भेटले. नपेक्षा माझें काय झालें असतें कोण जाणे!'

त्या बगडी दांपत्याचीं अंतःकरणें सारदादेवींनी पूर्णपणें काबीज केलीं व त्यांच्यांतील वात्सल्यभाव जागविला! त्या दरोडेखोराने दक्षिणेश्वरीपर्यंत माताजींना सोबत दिली व आपला पितृभाव अत्यंत चोखपणे पार पाडला. सांगण्यांत येतें, कीं या लुटारूने आपला निंद्य व्यवसाय पुढें बंद केला व तो परोपकारी पुरूष बनला.

अवतारी पुरूषांची प्रत्येक क्रिया लोकहितसाधण्यासाठींच असते. त्यांच्यावर गुजरलेले प्रसंगदेखील इतरांचें कल्याण साधण्यासाठींच असतात. दरोडेखोर सारदादेवींना म्हणाला होता, 'तुझ्या ठायीं मला काली दिसली!' उगाच का त्या लुटारूचें मन एकाएकीं पालटलें? आणि तेंही कायमचेंच? माताजींच्या दर्शनांत त्यास देवदर्शन घडलें!

**तेचि देवाचें दर्शन । जेणें होई परिवर्तन ।**
**चित्तिं नांदे समाधान । वाटे जीवन कृतार्थ ।।**
**दरोडेखोर दांपत्य । मानी सारदे अपत्य ।**
**देतसे पंथी सोबत । दुष्ट हेतू सांडतें ।।**
**लुटारूंच्याही हो मती । दृष्टिक्षेपें बदलती ।**
**जिच्या तिये मातेप्रती । मंदमती मी वंदितों ।।22।।**

श्रीरामकृष्णांनी एवढी घोर तपश्चर्या केली; कठोर साधनें केलीं; मगच ते परमहंसपदारूढ झाले. सारदादेवींनी काय केलें? अध्यात्मिक साधनें हीं मुख्यत्वेंकरून आंतर जगांतील. ती चित्तशुध्दिप्रीत्यर्थ करण्यांत येणारीं असल्यामुळें बाह्य चक्षूंस वा इंद्रियांस अगोचरच असतात; पण साधनांचें फळ मात्र व्यवहारिक पातळीवरून सर्वसाधारणपणें पाहातां येतें. 'दया भूतेश्वलोलुप्त्वं मार्दवं हीरचापलम् ।' वगैरे दैवी गुण हेच या साधनांचे फळ होय. गीतेच्या सोळाव्या अध्यायांत सांगितलेले दैवी गुण ज्याच्या ठायीं आहेत त्यांनी, या अथवा पूर्वजन्मीं, अनेक साधनें केलेलीं असलीं पाहिजेत, असा निष्कर्ष काढण्यास कोणताच प्रत्यवाय दिसत नाही..

श्रीरामकृष्णांनी साधनें कशा तळमळींतून करावीं, आपपरभाव टाकून, सर्वात्मभाव जोपून, विशाल व्यापक बुध्दीने साधनामार्ग कसा चोखाळावा, हें नाना-धर्मांतील साधकांना आपल्या जीवनद्वारें दाखविलें. तर त्याच साधकांना खरा सिध्द कसा असतो, साक्षात्कारी संत कोणाला म्हणावें? अखिल धर्मांचे अंतिम ध्येय काय? हें दाखविण्यास माताजी अवतरल्या. सर्व साधनांचें सार काय याचा आपल्या जीवनाने आणि शिकवणीने माताजींनी सर्वसाधारण प्रापंचिकांना बोध करून दिला. श्रीरामकृष्णांनी आचरलेला मार्ग तपस्व्यांसाठी; अत्यंत विरक्तांसाठीं. सर्वसामान्यांना तो सुतराम् दुष्कर.

सारदादेवींच्या जीवनाने आम्हाला सर्व साधनांचें सार काय याचा बोध होतो. कारण–

**भजनाचे अनंत प्रकार । संत सांगती सान थोर ।**
**कांहीं सौम्य कांहीं घोर । अनंतासी सेविण्या ।।**
**सर्व साधनांचें सार । राखावें इतरांचें अंतर ।**
**तेणें तोषे सत्वरि ईश्वर । सर्वांभूतीं राहि जो ।।**
**सर्वांभूतीं प्रीती जाण । हाचि सारदेचा प्राण ।**
**तेज जेवि दीपाचा गूण । प्रेम होई तियेचा ।।23।।**

जयरामबटी, कामारपुकूर आणि दक्षिणेश्वर यांमध्यें माताजी वरचेवर येजा करीत. चौथ्या खेपेस त्या आल्या आहेत. श्रीरामकृष्णांचा भाचा हृदय यावेळीं दक्षिणेश्वरीं होता. रामकृष्णांचा नातलग; त्यांत पुनः त्यांच्या सेवेंत राहणारा; म्हणून लोक त्याला फार आदरीत. आपणाला मिळणारा मान श्रीरामकृष्णांमुळे याची त्याला जाणीव नव्हती! उलट त्याला वाटे आपल्यामुळेंच व्यवहारज्ञानशून्य रामकृष्णांचे नीट चालत आहे. तो अति उध्दट बनला. प्रत्यक्ष रामकृष्णांची देखील अवहेलना करूं लागला. 'साधूनां दुर्जनाद्‌भयम्' म्हणतात तसें रामकृष्णांनां त्याचें भय वाटे. त्याची समजूत काढण्याचा रामकृष्णांनी प्रयत्न केला; पण व्यर्थ. ज्ञानलवदुर्विदग्धाची समजूत पाडणें ब्रह्मदेवाला सुध्दां अशक्य म्हणतात ना? तसेंच येथें झालें. माताजी या खेपेस येतांच त्यांचीही चढेल हृदयने, 'या येथें कशाला आल्या आहेत? काय आहे यांचें काम येथें?' अशा अवज्ञापूर्वक शब्दांनी अवहेलना केली. पण महासागरांत बेडूक पडावा तद्वत् हे शब्द माताजींच्या कर्णी पडले. त्यांच्या शांततेचा भंग झाला नाहीं! पण आई श्यामसुंदरी त्यांच्या समवेत आली होती. तिला वाटलें अशा स्थानीं टिकणें कठिण. तिच्या सांगण्यावरून माताजी जयरामबटीस परतल्या. हृदयच्या भयाने रामकृष्णही त्यावेळीं कांहीं बोलूं शकले नहींत; पण अशाच दुस-या प्रसंगीं ते हृदयला म्हणालेः

**' तिचा न ठावा तुज महिमा ।।धृ।।**
**ती जरि न करिल तुजसि क्षमा । पांगळे विष्णू शिव ब्रह्मा ।।**
**मज जरि अवमानस तरि तरसी । हृदु तव मामिस न तूं जाणसी ।।**
**असे का ती साधारण महिला । सरस्वति स्वयें धरि त्या तनुला ।**
**म्हणुनि नाम शारदा तिजला' ।।24।।**

माताजी जयरामबटीस परतल्या; आणि हृदयची, त्याच्याकडून घडलेल्या एका अपराधास्तव, कालीमंदिरांतून हकालपट्टी करण्यांत आली. पुढें त्याला अत्यंत हलाकींत दिवस कंठावे लागले.

दक्षिणेश्वरीं असतांना माताजींना, जीचा विस्तार 50चौरस फूटांहून अधिक नाहीं अशा, एका अष्टकोनीं खोलींत रहावें लागें. बसणें, उठणें, झोपणें, खाणें, पिणें सर्व कांहीं याच एका खोलींत. त्यांना अनेकांसाठी स्वयंपाक करावा लागे. त्यांत पुनः निरनिराळ्या भक्तांच्या आवडीनुसार

निरनिराळे पदार्थ बनवायचे, आठ आठ पौंड पिठाच्या चपात्या करायच्या, हा त्यांचा दैनिक क्रम. माताजींची खोली श्रीरामकृष्णांच्या खोलीपासून केवळ 75 फूट अंतरावर होती. पण माताजींना महिने न् महिने पतिदर्शन होत नसे. थोडक्यांत सांगायचें म्हणजे-

**करि निवास गंगातटिं । निकटिं असुनि नसे भेटि ।**
**पतिभंवतीं नित्य दाटि । भक्तजनांची ।।**
**नौबतखानीं ती राही । कुणि तिज न च कधिं पाही ।**
**सारदेसी दिसत नाहीं । किति तरि दिन पतिमुख ।।**
**पंजर जैसा पिकाचा । वास तसा सारदेचा ।**
**पाहुनि म्हणती तिजला । सीता अशोकवनिंची ही ।।**
**सूक्ष्माहुनि सूक्ष्म असे । तिज का तें कठिण दिसे ।**
**अल्पक्षेत्रिंहि वसणें । चिद्‌गुहेंत जी वसे ।।25।।**

या पिंजरवजा निवासीं राहून, स्वतःच्या सुखसोयींची मुळींच पर्वा न करतां, इतरांच्या सेवेंत नेहमी चूर असणें हें या काळच्या सारदादेवींच्या जीवनाचें, निदान बाह्यतः दिसणारें, स्वरूप. त्यांना या जीवनाचा कधीं वीट आला नाहीं वा असंतोषही वाटला नाहीं. त्यांची जनसेवा स्वार्थशून्य व स्वयंस्फूर्त होती. कोणाकडून काही नाहीं; आहे तें देण्याची मात्र तळमळ. भगवान गीतेंत म्हणतात, 'न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन । नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ।' तशाच प्रकारचें माताजींचें कर्म. आपण केलेल्या जनसेवेचें वा पतिसेवेचें पुण्य आपणास प्राप्त व्हावें असा विचार देखील त्यांच्या मनास स्पर्श करूं शकला नाहीं.

इतरांस जरी माताजी अपरिमित हालअपेष्टा सोशीत आहेत असें भासत असलें तरी त्यांना स्वतःला मात्र आपल्या अंतरांत आनंदाचा घडा जणूं नित्य हेलावत आहे असेंच वाटे. श्रीरामकृष्ण, त्यांचा शिष्यपरिवार आणि इतर भक्त यांची सेवा हाच जणूं सारदादेवींचा श्वासोच्छ्‌वास. सर्वसाधारणपणें श्रीरामकृष्णाभंवतीं भक्तांचा गराडा असायचा. त्यामुळें त्यांना दूरूनच पतिसेवा करावी लागे; पण याची त्यांना खंत नव्हती. कारण खरें प्रेम फक्त देऊंच मागतें; घेऊं इच्छीत नाहीं.

अत्यंत लाजाळू अशा माताजी बुरख्यांतच बावरत. रामकृष्णांसमोर येतांना देखील तोंडावर पदर ओढून घेत. कोणाचीही सेवा करतांना सुध्दां त्याच्या दृष्टीआड राहूनच त्या ती करीत. देवाची सवयच ती. लोकांच्या समोर न होतां, त्यांना नकळत, तो त्यांची काळजी नाहीं का वाहवीत?

एकदां माताजी श्रीरामकृष्णांच्या जेवणाचें ताट घेऊन त्यांच्या खोलीकडे जावयास निघाल्या. एवढ्यांत एका स्त्रीने त्यांना विनविलें, 'आई, ताट मजजवळ द्या. मी तें ठाकूरांकडे (श्रीरामकृष्णांकडे) घेऊन जाईन'. माताजींना जाणीव होती कीं या बाईचा स्पर्श झालेलें अन्न श्रीरामकृष्ण ग्रहण करणार नाहींत. पण माताजींना नकार देववेना. त्यानीं निमुटपणें त्या

बाईच्या हातीं ताट दिलें व तिच्या मागून आपणही श्रीरामकृष्णांच्या खोलींत शिरल्या. रामकृष्ण अन्नाला शिवेनात. माताजी जवळच बसून होत्या. ते माताजींना म्हणाले,'हें काय केलंत तुम्ही? तुम्ही नाहीं का त्या बाईला जाणत? तिचा स्पर्श झालेलें अन्न मी कसें घेऊं?' माताजी लाडिकपणे म्हणाल्या, 'ओळखतें मी तिला; पण आजचा एक दिवस घ्या'. तरीही श्रीरामकृष्ण ताटास स्पर्श करीनात. माताजींनी नम्रभावें त्यांस अन्न घेण्यास विनविलें. या प्रार्थनेने रामकृष्ण किंचित् नरमले आणि म्हणाले, 'पुनः कोणाच्या हातीं जेवणाचें ताट असें नाहीं ना देणार?'

माताजींचा भाव बदलला. लाजाळू, आज्ञाधारक पत्नीभावाच्या जागीं जगद्वात्सल्यभाव दिसूं लागला. तिचें मातृहृदय उसळून निघालें! पण सौजन्याचे उल्लंघन न करतां, अत्यंत नम्रपणे त्या म्हणाल्या, 'देवा! तेवढें मात्र मला करवणार नाहीं. होतां हाईल तों मीच तुमचें ताट वाढून आणीन. पण जर का कोणी 'आई' म्हणून हांक मारून माझ्याकडून ताट मागील तर त्याला नकार देणें मला अशक्य होईल.' पुढें त्या म्हणाल्या, 'तुम्ही काय माझ्या एकटीचेच आहांत? तुम्ही सर्वांचेच नाहीं का?' हें उत्तर मिळतांच शिष्य आपणाहून सवाई निघाल्याच्या आनंदांत रामकृष्ण प्रसन्नपणें भोजन करूं लागले. या उत्तराने माताजींना आपण मुख्यत्वेंकरून सर्वांचीच माता; आपलीं इतर नातीं गौती, असेंच सुचवायचें नव्हतें कां? आणि श्रीरामकृष्णांनां देखील प्रत्यक्ष जगदंबाच आपल्या सेवेत मिळाल्याचा आनंद वाटल्यास, त्यांत आश्चर्य काय?

थोडक्यांत सांगायचें म्हणजे माताजींची जीवनरीती अशी होतीः-

**ठाकूरांचे पायीं चित्त नित्य ठेवी । स्वतःचा न कांहीं विचार ये ।**
**करी न पुण्याची गणना कदापी । देई पापिणीसी सेवासंधी ।।**
**साधनहीं जीचें नसे स्वतःसाठीं । तिच्या भवगांठी लटक्या सा-या ।।26।।**

अज्यात्मांत प्रगति साधायची म्हणजे काया, वाचा आणि मन या तीहींनाही योग्य तें वळण लावावें लागते. प्रथम मनाने विवेक करावा. सत्य काय, असत्य काय, बरें काय, वाईट काय, निर्भेळ सुख कोणतें, संमिश्र सुख कोणतें, या सर्व गोष्टींचा, सर्वप्रकारचे पूर्वग्रह टाकून, प्रथम विचार करावयास हवा; आणि तोही अत्यंत निर्लिप्तपणें. ज्याचें मन सर्व विषयांत दोष पाहून निर्लिप्त होतें, तोच निष्काम करूं शकतो. 'परीक्ष्य लोकान् कर्मचितान् निर्वेदमायात्!' या श्रुतिवाक्याचें हेंच तात्पर्य. अशा निष्काम कर्मयोग्याचा आदर्श जनतेसमोर ठेवण्यासाठींच माताजींचा अवतार होता. सदैव कर्म करीत असतांही त्यांची अंतर्मुखता ढळली नाहीं. क्षणभरही चळली नाहीं. 'न मे पारथास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन! नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि।।' असें म्हणणा-या श्रीकृष्णाप्रमाणे आत्मरत राहून त्या आदर्श जीवन जगत असत.

एकदां एका भक्ताने माताजींना विचारलें-

**‘सांग आई तूं राबसि रातंदिनिं कां ।**
**आदिशक्ति अससी तूं प्रकृति जरि परा ।।**
**रामकृष्णिं दिसे नित्य समाधिस्थिती ।**
**परि तुझ्यांत न ते भाव अम्हा भासती’ ।।**
**भक्तें पुसितां ऐसें म्हणे सारदा ।**
**‘ईश्वर स्वीकारि नारि कुणिहि का कदा? ।।**
**प्रतिदिवशीं जपतें जप शतसहस्त्र मी ।**
**साध्य काय होई हें पामरा कधीं? ।।**
**करितें मी काजा आदर्श दाविण्या ।**
**धर्ममार्ग आक्रमुनी ईश सेविण्या ।।**
**स्थिरचरादि दर्शवुनी मना खेंचतें ।**
**व्यवहारिक जगतीं त्या बळें ठेवितें ।।27।।**

श्रीसारदादेवींच्या जीवनांत ज्ञान, भक्ति व कर्म यांचा गोड मिलाफ झालेला आम्हाला दिसून येतो. आपल्या दिव्यत्वाचा त्यांना कधींच विसर पडला नाहीं. स्वतःचें मन बळेंच व्यवहारिक भूमीवर ठेवून लोकहितास्त्व त्या आपलें शरीर राबवीत. ब्रह्मानंदांत नित्य बुडून राहण्याचें सामर्थ्य असून सुध्दां लोकप्रेमास्तव त्या स्वानंदसाम्राज्याचा त्याग करून दुःखद व्यवहारिक कर्मभूमीवर उतरत व अनेक हालअपेष्टा सोशीत. आणि हें सर्व जनकल्याण साधण्यासाठीं-जनतेस योग्य मार्गदर्शन करण्यासाठीं.

ज्ञान, भक्ति व कर्म अंतीं एकरूपच होतात. कारण ज्ञानसंपादन, भावना आणि इच्छा हे एकाच मनाचे त्रिविध आविष्कार होत. मानसशास्त्रज्ञ मनाची व्याख्या करतांना म्हणतात,’जें जाणतें (वा चिंतन करतें), ज्यांत भावना स्फुरतात व इच्छा उपजतात, तें मन. मन पूर्णपणें शुध्द झालें असतां-कामगंधहीन झालें असतां-त्यास विशेष ओज येतें. त्यास दिव्यत्व प्राप्त होतें.

ज्ञानयोग, भक्तियोग व कर्मयोग आरंभी जरी भिन्न भासत असले तरी शेवटीं ब्रह्मात्मैक्यज्ञानांतच परिणत होत असतात; आणि असें ज्ञान झाल्यावर त्या ज्ञानी पुरूषाचीं कर्मे केवळ तृप्तीचे ढेंकर, प्रेमाचे निर्झर किंवा ज्ञानाचेच आविष्कार वाटतात. व्यवहारकाळीं देखील त्यांच्या ब्रह्मानुभूतीमध्यें खळ पडत नाहीं. सारीं प्रापंचिक कर्मे ते ब्रह्माकारवृत्तींतूनच करीत असतात. आपण असें पाहतों कीं अगदी क्षुल्लक कारणाने देखील त्यांचें देहभान हरपून ते मनइन्द्रियातीत अवस्थेंत जातात.

एकदां सारदादेवी कलकत्त्याला राहत असतां जतींद्रमोहन नामक गृहस्थाच्या कीर्तनास आमंत्रणावरून गेल्या होत्या. कीर्तन ऐकतां ऐकतां त्यांना गाढ समाधि लागली आणि त्यांना टांग्यापर्यंत उचलून आणावें लागलें.

बराच वेळ झाला तरी माताजी देहभानावर येईनात असें पाहून एकजण म्हणाली, ‘माताजींनी अवतार घेतला आहे तो पुत्रवात्सल्यामुळें. तेव्हां ’आई’ नांवाने तिच्या कानांत हांका मारा म्हणजे त्या देहभानावर

येतील'. सर्वांस ही सूचना पटली. लगेच माताजींच्या कानांत 'आई' नामाचा काहीं वेळां उच्चार करण्यांत आला; आणि आश्चर्य असें की थोड्याच अवधींत माताजी पुटपुटूं लागल्या, 'कां बाळ? काय?' सर्वांना धीर आला! अशा अनेक घटना माताजींच्या जीवनांत आम्हाला दिसून येतात. प्रगाढ समाधींत जाणें हें त्यांच्या बाबतींत अगदींच स्वाभाविक होतें. त्यांच्या जी व्यवहारोन्मुखता दिसून येई ती त्यांना इतरांविषयीं वाटणा-या कळवळ्यामुळें!

श्रीरामकृष्णांनी आपल्या कांहीं निवडक शिष्यांसाठीं आहारविहाराचे विशिष्ट नियम घालून दिले होते. कोणी किती पोळ्या खाव्या, वगैरे ठरवून दिलें होतें. अर्थातच माताजींना हे नियम ज्ञात होते. आणि त्यां नियमांनुसार नरेन्द्रादि (स्वामी विवेकानंदादि) रामकृष्णशिष्यांना अन्न वाढणें हें सामान्यतः त्यांचें कर्तव्यही होतें. पण माताजींचें मातृहृदय या नियमांच्या मर्यादा राखूं शकणार कसें? हे सारे नियम झुगारून माताजी या शिष्यांना पोटभर अन्न वाढीत-ठरलेल्या संख्येपेक्षां अधिक पोळ्या घालीत. एके दिवशीं हें रामकृष्णांच्या नजरेस आलें आणि ते किंचित् त्रस्त होऊन माताजींना म्हणाले, 'काय करतां हें तुम्ही? अशाने पोरांचे अकल्याण होईल. आहारआदींचें नियमन त्यांनी नाहीं केलें तर ते ध्यानजपादि नीट करू शकणार नाहींत. मग त्यांची आध्यात्मिक प्रगति होणार कशी? कोण जबाबदार याला?' हा प्रश्न कर्णीं पडतांच येथवर शांत असलेल्या माताजी आवेशून म्हणाल्या, 'मी घेतें त्यांची जबाबदारी. त्यांच्या अन्नपानावर एवढी कडक दृष्टि नको ठेवायला.' या उत्तरावरून श्रीरामकृष्णांनी ताडलें कीं एरवीं अत्यात शालीन अशा माताजी नकळतच गुरुपदीं आरूढ होत आहेत. केवळ प्रेमाने प्रेरित होऊनच खरा निरिच्छ गुरु गुरुपद स्वीकारतो ना?

आपल्या पश्चात् आपलें कार्य चालविणारी समर्थ व्यक्ति सांपडल्याने रामकृष्णांना अतिव आनंद झाला. माताजींच्या योग्यतेची त्यांना, तशी जाणीव होती; पण अत्यंत लाजाळू अशा माताजी आपलें लोकजागृतीचें, अध्यात्मज्ञानवितरणाचें कार्य आपल्या मागून चालविण्यास तयार होतील कीं काय याची त्यांना शंका वाटत होती. पुत्रवत्सल माताजींचा प्रेमभाव त्यांस स्वस्थ बसूं देणार नाहीं; लोककल्याणास्तव अहर्निश खपायला लावणार, असें त्यांचे मन त्यांना आतां अंतरांतून आश्वासूं लागले. ते मनच्या मनीं म्हणू लागलेः

**प्रेम साकारी भूवरी निष्काम निर्मळ ।**
**सारदारूपें साधण्या जगाचें मंगल ।।**
**निरानंद या संसारीं छंद एक तीचा ।**
**दुष्ट दुराराध्यातेंही नित्य सेविण्याचा ।।**
**याचि एक छंदापायीं राज्य सांडियेलें ।**
**चवदा भुवनांचें तीने दैन्य स्विकारीलें ।।28।।**

मातार्जीकडे येणा-या भक्तांमध्यें अनेक विक्षिप्त व्यक्ती पण असत. त्यांच्या लहरी स्वभावांमुळें माताजींना बरेच त्रास सोसावे लागत; पण आपल्या उदरांत मासे नाचता-बागडतांना समुद्राला त्याचा शीण वाटतो का? अगदीं तसेंच माताजींच्या बाबतींत होत असे. एकदां तर नमस्कार करतांना एका बाईने माताजींच्या अंगठ्याचा कडकडून चावा घेतला; आपली आठवण माताजींना रहावी म्हणून! दुस-या एकाने माताजींच्या पायावर आपलें डोके एवढ्या जोराने आपटलें कीं बराच वेळपर्यंत माताजींना पायांतून सारख्या कळा येत होत्या! असे हे आपल्या लेकरांचे चाळे निमुटपणें त्या सहन करीत. एवढेंच नव्हे तर उलट त्यांना उलट प्रेमपुर्वक आशीर्वाद देत! या गोष्टी इतरांना सांगतेवळीं कौतुकाने त्या हसत! पोटच्या लेकरांना सुध्दां आईने, अशा प्रसंगी चापट्या हाणल्या असत्या. असे अनेक प्रसंग माताजींच्या जीवनांत आढळून येतात, पण नमुन्याखातर केवळ दोनच घटनांचा येथें उल्लेख केला.

माताजींचें प्रेम हें जगन्मातेचें प्रेम होतें. खासजन्मादात्री माता सुध्दां असें निष्काम प्रेम करीत नाहीं. त्यांच्यात मातृभाव अधिक प्रकर्षाने वसत होता का दिव्यभाव हें सांगणें कठिण. पण सर्वसामान्यांना त्यांचा दिव्यभाव सहसा दिसून येत नसे; मातृभावाने तो आच्छादित होई. साक्षात् भगवतीच मानवी वेश घेऊन आल्यावर तिला ओळखावें कुणी? सामान्य मानसाच्या प्राकृत दृष्टीला ती मानवच दिसणार. पण श्रीरामकृष्णांसारख्या, स्वामी विवेकानंदांसारख्या दिव्य विभूतींच्या दृष्टींतून मात्र तिचें दिव्यत्व निसटणे शक्य नाहीं. श्रीरामकृष्ण माताजींना भगवती ज्ञानाने आदरीत. ज्ञानीजन सारदादेवींना साक्षात् परमात्मशक्ति मानीत; पण सर्वसाधारण भक्तांना मात्र हें एक कोडें वाटें. भगवती जेव्हां अवतरते तेव्हां एखाद्या दिव्य पुरुषानेच तिची ओळख करून दिल्याशिवाय, एखाद्या अलौकिक घटनेमुळें तिचें दिव्यत्व दिसून आल्यावांचून, सामान्यमाणसांस तिच्या ख-या स्वरूपाची जाणीव होणार नाहीं.

अवतारी सर्वसाधारणपणें अतिशय नम्र असतात. तशाच अधिकारी साधकांकडे मात्र, त्या साधकांच्या हितास्तव, आपलें दिव्यत्व तें व्यक्त करितात. गीतेंत श्रीकृष्ण अर्जूनाला आपण त्रिगुणातीत, सर्वाधार आणि सर्वव्यापक असल्याचें सांगतात; पण आपण सांगितलेल्या गोष्टींची वाच्यता ख-या श्रध्दाळू भक्तांवाचून इतर कुणाशींही न करण्यास बजावतात. श्रीरामकृष्णांचा नम्रभाव तर पराकोटीस पोंचलेला होता, हें त्यांच्या जीवनाचा अत्यल्प परिचय असणा-यालाही माहीत आहे. माताजींचेंही तसेंच होतें. त्यांच्या नम्रतेचा मासला म्हणून एका प्रसंगाचा येथें उल्लेख करूं.

माताजींच्या शेवटच्या आजाराचे ते दिवस. त्यावेळीं एक वृध्द भक्त स्त्री माताजींना म्हणाली, 'तुम्ही साक्षात् जगज्जननी आहांत. तुम्ही सर्व कांहीं आहांत'. या स्तुतीने माताजी संतप्त झाल्या व आवेशाने गरजल्या,

'थू; थू! म्हणे जगज्जननी! तूं जगज्जननी; तूं सर्व काहीं आहेस! मी आज जी आहे ती त्यांच्या कृपेमुळें; त्यांनी मला आपल्या चरणीं आश्रय दिला, माझ्यावर कृपा केली, म्हणून. म्हणे जगज्जननी! चल येथून'. माताजी अशा कठोर शब्दांनी सहसा कोणालाही दुखवीत नसत पण स्तुतिपाठकांची त्यांना अत्यंत चीड येई.'वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि' ही माताजींची जात.

अवतार किंवा थोर पुरुष एरवीं अत्यंत नम्र असले तरी केवळ लोकहितास्तव त्यांना आपल्या शक्तीची अभिव्यक्ति करावी लागते. आपण अवतार असल्याचे श्रीरामकृष्णांनी केवळ नरेन्द्राला (स्वामी विवेकानंदांना) सांगितलें, इतरांना नाहीं सांगितलें. पण इतर लोक त्यांना अवतार मानीत हें खरे. माताजींचा मोठेपणा होतां तो आपली थोरवी लपविण्यांत. आपल्या बळाने आपण कांहींही करतें असें त्या कधींच म्हणत नसत-आपल्याकडे मोठेपणा घेत नसत. ठाकूरांची प्रार्थना करीत व 'ठाकूर तुमचें अभीष्ट करील' असेंच म्हणत.

एकदा जयरामबटींत व आसपासच्या खेड्यांत अवर्षणामुळें दुष्काळ घोर पडण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. भयभीत झालेले शेतकरी माताजीपाशीं आले व आपल्या दुर्दैवाची कहाणी सांगूं लागलेः

**'दैव कोपलें आम्हावरतीं । कशी करुं अजि आम्ही शेती ।**
**टपके न कधीं बिन्दु जलाचा । घोर काळ हा अवर्षणाचा ।।**
**पोरें अमुचिं भुकेलिं मरतिल । करपुनि शेतें अमुचीं जातिल' ।**
**म्हणती शेतकरी ते व्याकुल । मातेप्रति विव्हल होउनी ।।**
**पाहूं जाते त्यांचीं शेतें । हिरवें न दिसे एकहि पातें ।**
**दुःख अनावर होई माते । ठाकुरांसि प्रार्थिते दुःखिता ।।**
**पडला पाउस पीक निघालें । कणीस इतुकें न कधीं आले ।**
**खेडुत अंतःकरणीं धाले । देति दुवा माते सगळे ।।29।।**

खेडुतांनी घातलेलें गा-हाणें ऐकतां ऐकतां माताजींचें मन पाझरूं लागलें; नेत्रावाटे अश्रू झरूं लागले. त्यांनी ठाकूरांची प्रार्थना केली व ती लगेच फळली. वृष्टि व्हावी म्हणून देवापाशीं इतर जनांनीही प्रार्थना नव्हती का केली? अवश्य केली असावी. पण त्या प्रार्थनेंत आवश्यक तें बळ नव्हतें. परमात्म्याला आपली इच्छा पूर्ण करण्यास भाग पाडण्याचें तिच्यांत सामर्थ्य नव्हतें. जी शक्ति अखिल जनसमुदायांत नव्हती ती सारदादेवींच्या ठायीं होती, हेंच त्यांचें दिव्यत्व. असें दिव्य भव्य कर्म करण्याचें सामर्थ्य आपल्या स्वतःच्या ठिकाणीं असून देखील तें त्यांनी नम्रतेच्या बुरख्याखालीं झांकून ठेवलें आणि ठाकूरांना माध्यम करून खेडुतांचें अभीष्ट साधलें. तशाच अधिकारी भक्ताशीं त्या आपली अंतस्थ ईश्वरी शक्ति प्रकट करीतही.

एकदां श्रीसुरेंद्रनाथ सेन या गृहस्थांना स्वामी विवेकानंदांकडून मंत्रदिक्षा देण्यांत यावी म्हणून आसन मांडून बसविण्यात आलें. पण स्वामी

विवेकानंदांनी सुरेंद्रनाथांना दीक्षा देण्याचें नाकारलें. ते म्हणाले, 'मला ठाकूरांनी (श्रीरामकृष्णांनी)सांगितलें आहे कीं माझ्याहून श्रेष्ठ व्यक्तीकडून तुला दीक्षा मिळेल'. यानंतर थोड्याच दिवसांत सुरेंद्रनाथांना एक स्वप्न पडलें. स्वप्नांत त्यांना दिसलें कीं ते स्वतः श्रीरामकृष्णांच्या मांडीवर बसलेले आहेत आणि एक वात्सल्यपूर्ण स्त्रीकडून मंत्रदीक्षा घेत आहेत. त्यानंतर बऱ्याच दिवसांनी, 1911 मध्ये, सुरेंद्रनाथांना माताजींकडून मंत्रदीक्षा मिळाली. आधीं स्वप्नांत मिळालेलाच मंत्र आतां माताजींकडून पुनश्च मिळाल्याचें पाहून त्यांच्या आश्चर्याला पारावार राहिला नाहीं. आणि मंत्रदात्री स्त्री देखील अगदीं स्वप्नांतीलच होती! आनंद आणि आश्चर्य यांनी भारावलेलें त्यांचें मन देहभानाच्या तटबंदींतून मुक्त होऊन कांहीं काळ अन्य जगांत विहरूं लागलें.

माताजींच्या अलौकिकत्वाची साक्ष देणारे अनेक असे प्रसंग आहेत. त्यापैकीं एकाच घटनेचा उल्लेख करूं

**बारिसाल ग्रामिंच्या एक वंग युवाला ।**
**रोग राजयक्ष्मा अति दुर्धर पैं जाहला ।।**
**रक्तलोळ उत्क्षिपे ईशनाम तो जपे ।**
**सारीं भेषजें ठरती फोल खिन्न जाहला ।।**
**अंत जवळि पातला म्हणुनि त्रस्त जाहला ।**
**सारदेसि प्रार्थितसे दर्शन देण्या तदा ।।30।।**

श्रीसुरेंद्रनाथ राय हे अतिगंभीर अशा रोगाने बारिसाल येथें आजारी होते. आपला अंत जवळ येऊन ठेपलेला आहे; त्याअगोदर आपण माताजींचें एकवार दर्शन घेऊन पुनीत व्हावें अशी त्यांना अति उत्कट इच्छा झाली; आणि लगेच त्यांनी माताजींना पत्र टाकलें. त्याचा आशय असा-

**येइ येइ माउली सारदे । करि ग कृपासाउली सुतावरि ।।धृ।।**
**तव आगमना आतुर नयनीं । कातर होउनि मनी प्रतीक्षीं ।**
**पामर मी अज्ञानकाननीं । कोटि कोटि योनी फिरतसें ।**
**नामजपाचें पुष्प अर्पितों । भक्तिचें त्या गंध लावितों ।**
**वैराग्याचा धूप जाळुनी । ध्यानदीप उजळितों ।।**
**पूजे अंतीं करितों अर्पण । विषयपिपासा सारी सांडुन ।**
**तुझीच सेवा ऐसें कल्पुन । अखिल कर्मनैवेद्य ।।31।।**

सुरेंद्रनाथांनी पत्र टाकलें खरें, पण-

**बारिसाल ग्राम दूर । करि न शिष्य हा विचार ।**
**येण्या माते सत्वर । पत्र पाठवी ।।**
**सारदाही पत्रोत्तर । धाडी जेथ असे पुत्र ।**
**चिठिसंगे छायाचित्र । अपुलें त्या पाठवी ।।**
**'छायाचित्रिं मीच वसें । मज येणें शक्य नसे' ।**
**माय मुला सांगतसे । 'चित्रिं पाही तूं मला' ।।**

**'उद्‌बोधन' वाचण्यास । सांगे माता युवास ।**
**चेतवुनी ती चित्रा । दर्शन देई मुला ।।**
**रोगमुक्त होई युवा । देतसे मातेसी दुवा ।**
**'अमितशक्तिमती शिवा' । म्हणे माझी माता ।।32।।**

वार्धक्याने आणि व्याधीने क्षीण झालेल्या माताजींना ब-याच अंतरावर असलेल्या बारिसाल गावीं जाणें शक्य नव्हतें; आणि माताजी तर सर्वव्यापक असतां त्यांना स्थूल शरीराने तेथें जाण्याची जरूरी तरी काय होती? माताजींनी योग्य तेंच केलें. आपलें छायाचित्र सुरेंद्रनाथांकडे पाठविलें आणि त्या चित्रांत व आपणांत कांहींच फरक नसल्याचें त्यांस सांगीतलें. जी अणूरेणूंत भरून आहे तिची देवीज्ञानाने कशांतूनही पूजा केलीं तरी तिलाच पोंचते हें मुर्तिपूजेचें रहस्य जाणणा-यांना सहज समजूं शकतें. सर्वव्यापी, सर्वमातृरूपिणी सारदा सर्वांसन्निध आहे हें त्या बिचा-या सुरेंद्रनाथांना कळलें नाहीं; म्हणूनच त्यांनीं माताजींना तसें पत्र लिहिलें. भगवती सारदेच्या इच्छेने, कृपेने सुरेंद्रनाथ रोगमुक्त झाले! ते म्हणूं लागले-

**'छायेंतुनि माय तुझे पाय ध्यायिले ।।धृ।।**
**ध्यातां तव पुण्य चरण । मन झालें मम पावन ।**
**व्याधि सारि गेली टळुन । ह्रदय उजळलें ।।**
**ब्रह्मानंदाचा तूं झोत । ज्ञानाची वा जळती वात ।**
**अवतरतां अंतरांत । केंवि भय उरे? ।।**
**करुणेची तूं मूर्ती । केली तुजवरि प्रिती ।**
**ओसरली मम भीती । मोद चहुंकडे भरे' ।।33।।**

माताजींनी आपल्या छायाचित्राची पूजा करावयास सांगून व त्यांतून सुरेंद्रनाथांना दर्शन देऊन मूर्तिपूजेचें महत्त्व जगाच्या निदर्शनास आणलें. श्रीकृष्ण भगवान गीतेंत म्हणतात, 'मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना । मत्स्थानिसर्वभूतानि न चाहं तेष्ववस्थितः।' याचा आशय असा कीं परमात्म्याचें समष्टि मन सर्व वस्तूंना आणि व्यक्तींना व्यापून राहिलें आहे. किंबहुना त्याच्याच ठायीं जग स्थित आहे; पण परमात्मा जगामध्यें नाहीं; म्हणजेच जगाला मुळीं स्वतःचें असें स्वतंत्र अस्तित्वच नाहीं. परमात्म्याच्या ठिकाणीं तें केवळ अज्ञानामुळें-परमात्म्याच्या मायेने-भासणारें आहे. हीं सृष्टि अज्ञान आहे तोंवरच सत्य भासते. रज्जु पाहतांच त्यावर भ्रमाने भासणारा सर्प जसा खोटा ठरतो. तसेंच या जगाच्या अधिष्ठानभूत परमात्मतत्त्वाचें ज्ञान होतांच त्यावर दिसणारें हें विश्व मिथ्या ठरतें. मग भक्त सर्वभावें भगवंतालाच शरण जातो.

परमात्म्याची प्रतिमा त्याच्या गुणांचें, महिमेचें, आम्हास स्मरण घडविते. या स्मरणाने आमच्यांत देवज्ञान उपजतें. त्या देवज्ञानाने आमच्यांतला 'कर्तृत्वभाव' अभिभूत होतो. नंतर परमात्मा तेवढा सत्य; तोच हा सारा प्रपंच आपल्या मायाबलानें उभवितो, चालवितो असें भक्तास दृढ

ज्ञान होतें. या ज्ञानाने भक्ताचा देहोऽहंभाव (देहच मी ही भावना) नष्ट होऊन तो चिन्मात्ररूपें उरतो. शेवटीं स्वतःच परमात्म्याची प्रतिमा बनतो! सर्व द्वंद्वांच्या पलीकडे जातो!

हें सर्व घडतें त्यास कारण काय? कारण असें कीं अवतारांच्या ठिकाणीं आपली शक्ति इतरांत संक्रमित करण्याचें जसें सामर्थ्य असतें तसेंच, कांहीं प्रमाणांत, त्यांच्या छायाचित्रांतही तें असतें. आरशांतून परावर्तित झालेलीं सूर्यकिरणें ज्या वस्तूंवर पडतात त्यांना तीं प्रकाशित करतात; तसेच अवतारी पुरुषांच्या छायाचित्रांतून, तसबीरींतून वा मूर्तीतून अवतारांच्या आध्यात्मिक शक्तिचें तरंग बाहेर निघून आम्हांवर विविध प्रकारचे परिणाम घडवूं शकतात. आकाशवाणीच्या केंद्रावरून गायिलीं जाणारीं गाणीं जशीं रेडियोमधून आम्ही ऐकूं शकतों तसेंच देवाच्या मूर्तींतून आम्ही देवदर्शन करून घेऊं शकतो. ध्वनितत्त्व सर्व आकाशास व्यापून आहे म्हणूनच आम्हास रेडियोतून गाणीं ऐकणें साध्य होतें. परमात्मतत्त्व तर आकाशाहूनही सूक्ष्म. तें अनवच्छिन्न असून आकाशालाही व्यापून राहतें. अर्थात् तें अवतारांच्या छायाचित्रांतही असतें. त्या चित्रावर भक्ताने केंद्रित केलेल्या दृष्टीमुळें तें उत्तेजित होऊन भक्ताच्या प्रार्थनेस साद देतें.

सुरेंद्रनाथांनी माताजींच्या तसबिरीवर भक्तिपूर्ण दृष्टि खिळवितांच त्या छायाचित्रांतील ईशशक्ति जागृत झाली. त्या शक्तिचे स्पंद सुरेंद्रनाथांच्या शरीरावर व मनावर इष्ट तो परिणाम घडवून आणूं शकले. आजदेखील आम्ही निरतिशय प्रेमानें सारदादेवींच्या चित्रासमोर बसून, त्या स्वतः तेथें स्थित आहेत या भावनेने त्यांची प्रार्थना करूं तर ती खचितच फळेल. माताजी आपल्या पार्थिव शरीरांतून जें करूं शकल्या तें त्या आपल्या मुर्तींतून, चित्रांतूनही करूं शकतात, याची साक्ष आम्हास मिळाली. माताजी व्यक्त, पार्थिव, शरीरांत जरी एकदेशी दिसत होत्या तरी त्या आपल्या अव्यक्त रूपांत सदैव आणि सर्वत्र वसत आहेत, याविषयीं आतां आम्हाला तिळमात्र संशय राहिला नाहीं.

एक थेंब पाण्यांत चारच मिठाचे कण टाकले तरी तें खारट होतें; पण तोच थेंब विहिरींत टाकल्यास विहिरीचें पाणी यत्किंचित्ही खारट झाल्याचें दिसत नाहीं. तसेंच, सामान्य माणसांत दोषांची विपुलता आणि गुणांची वाण असल्यामुळें ते दुष्ट वाटतात. पण त्याच माणसांमध्यें एखाद्या समर्थ व्यक्तीकडून वा अवतारी पुरुषाकडून शुध्द विचारांचा, सद्गुणांचा प्रचंड प्रवाह संक्रामित करण्यांत आला, म्हणजे त्याचे दोष, त्याचीं पापें त्या प्रवाहांत विरून जातात. या सिध्दांतास पुष्टि देणारे अनेक दाखले आम्हाला माताजींच्या जीवनांत सांपडतात.

जेव्हां स्वामी विवेकानंद परदेशांतून परत आले तेव्हां त्यांची कलकत्त्यांत बरीचशीं व्याख्यानें झालीं. त्या व्याख्यानांतून विषयपिपासू पामरांस त्यांनी दिलेला आदेश अर्थतः असा होता–

**‘व्यर्थ कां रे पायपिट? । येत न का तुजसि वीट? ।**
**सरे कैसी भववाट । करी हा विचार ।।**
**करी वेळीं सद्‌विचारा । चुकवि संसाराचा फेरा ।**
**नको मनीं देऊं थारा । मोहमत्सरां ।।**
**घेई सदा ईश नाम । जेणें जळुनी सर्व काम ।**
**लाभेल आनंदधाम । विश्वाचें विश्राम‘ ।।34।।**

स्वामीजींच्या या भाषणांनी प्रभावित झालेले तिघे गृहस्थ अनुतप्त होऊन किंचित् अंतर्मुख बनले व आपल्याशींच विचार करूं लागले-

**’सफल करुनि घेउं आजि जन्म आपुला ।**
**नैक योनि हिंडुनि हा देह मिळविला ।।**
**अजुनि कसा वीट न तो येइ भवाचा ।**
**दवडितां अमोल काळ अम्हा फुकाचा? ।।**
**विषयचिंतनांत जरी आयु खर्चिलें ।**
**सारें तरि न च अमुचें मन त्यां विटलें ।।**
**सांडुनि संसारकथा आठवूं हरी ।**
**ईशप्रेम अतियत्नें सांठवूं उरीं ’।।35।।**

निराश झालेल्यांना चेतना देणारा आणि अनुतप्तांमध्यें आत्मविश्वास नी श्रध्दा निपजविणारा, स्वामीजींचा उपदेश ऐकून आपल्यालादेखील ’देव लाभूं शकेल’ असा या तिघांना भरवसां वाटूं लागला. विवेकानंदांचा संदेश श्रीकृष्णाच्या गीतेमधील ’अपि चेत् सुदुराचारो भजते मामनन्यभाक् । साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः।।’ या वचनाचा सूर धरणारा होता. त्या संदेशाने उत्तेजित झालेलें तें त्रिकूट ’आपलें उर्वरित जीवन तरी सार्थकीं लावूं, अध्यात्मचिंतनांत तें घालवूं’, अशा विचाराने कलकत्त्यांतील बेलूर मठांत दीक्षा घेण्यासाठीं दाखल झालें.

**दीक्षेची । याचना करीती बेलूरीं । मठाचिये द्वारीं । तीघे उभे ।**
**कोणा नोहे धीर । जरी स्वामी थोर । देवतुल्य नर । असतीं तेथें ।।**
**कोणी न स्वीकारी । पाप त्यांचें भारी ।म्हणोनी त्यां घरीं । वदती जाण्या ।।**
**परी तें त्रितय । करोनी निश्चय । सोडी न च पाय । साधूंचे त्या ।।**
**साधू त्यां धाडीती । मातेप्रती अंतीं । पदीं तेही येती । सारदेच्या ।।36।।**

दीक्षा देणें हें कांहीं सोपें काम नव्हे. ख-या गुरुला शिष्याच्या आध्यात्मिक जबाबदारीचा बराच मोठा वाटा स्वतः पेलावा लागतो. शिष्य पापवृत्तीचा, दुराचारी असला म्हणजे त्याच्या पापांचे अनिष्ट परिणाम गुरुच्या शरीरावर होत असतात. केवळ शिष्याच्या कानांत मंत्र फुंकणें म्हणजे मंत्रदीक्षा नव्हे. शिष्याचा पापभार अंशतः तरी हलका करून त्याचें आध्यात्मिक जीवन सुकर करणें हें गुरुचें मुख्य कर्तव्य. हें आपलें कर्तव्य चोखपणें बजावल्यावांचून खरा गुरु समाधान पावणार नाहीं. याचा अर्थ असा नव्हे कीं एकदां गुरुनें दीक्षा दिल्यावर शिष्याला कांहींच करावें लागत नाहीं.

गुरुच्या उपदेशानुसार त्याला साधनें करावींच लागतात. पण एखादा अत्यंत पापी, दुराचारी, दुष्ट संस्काराचा शिष्य निघाला म्हणजे त्याच्याकडून गुरुउपदेशानुसार साधनेंदेखील करवणार नाहींत; आणि त्याच्या पापांचें फळ मात्र गुरुला भोगावें लागेल. कर्मफळ भोगल्याविना संपत नाहीं. शिष्याला किंवा त्याची जबाबदारी घेणा-या गुरुला तें भोगावें लागतें.

साक्षात्कारी गुरु आत्मनिष्ठ व परमात्मस्वरूप झालेला असल्यामुळें पापी माणसांना दीक्षा दिल्याने, आध्यात्मिक दृष्ट्या त्याची तशी हानी होऊं शकत नाहीं. ब्रह्म हें नित्य, निरंश व निर्गुण आणि ब्रह्मवेत्ताही तत्त्वतः तसाच. त्याच्या ठायी देहभाव, भेदभाव नसतो. तो अजड चैतन्याशीं एकरूप झालेला असल्यामुळें जड कर्में-पापपुण्यें-त्याच्या आत्मनिष्ठेवर, आत्मरूप झालेल्या मनावर कोणताच परिणाम करूं शकत नाहींत. पापपुण्यात्मक कर्म हें जड. तें जड शरीरावरच, किंबहुना जड शरीराशीं तादात्मभाव ठेवणा-यावरच, परिणाम करूं शकणार. म्हणून दुराचारी लोकांस दीक्षा दिल्याने समर्थ, साक्षात्कारी, गुरुच्या केवळ जड शरीरावरच अनिष्ट परिणाम होत असतात. त्याच्या आत्मनिष्ठेंत बिघाड येत नाहीं. पण इतर माणसांची गोष्ट मात्र निराळी. त्यांचा जड शरीराशीं तादात्मभाव असल्यामुळें त्यांनीं आत्मसाक्षात्काराअगोदर इतरांस दीक्षा देऊं नये. कारण त्यांच्या शिष्यांचीं पापें त्यांच्या शराराशीं एकरूप होऊन राहणा-या मनावर आघात करून त्यांना आध्यात्मिक क्षेत्रांत देखील प्रगति करू देणार नाहींत.

मन हें शरीर आणि आत्मा यांना जोडणारा अविद्यारूपी सांखळीचा जणूं एक दुवा होय. ज्ञानी, आत्मसाक्षात्कारी माणसांमधील, 'अविद्या' अत्यंत दुबळी असते. त्यामुळें त्यांस ती जड शरीराशीं, जड कर्माशीं बांधून ठेवूं शकत नाहीं. असें जड विषयांशीं जखडून ठेवण्याचें सामर्थ्य केवळ 'अविद्येंत (अज्ञानांत)' असतें. ही अविद्या गेली कीं मनुष्य मुक्त झाला. अशा मुक्त माणसाचीं कर्मे त्याला लिंपूं शकत नाहींत; कारण तो आपल्याकडे 'कर्तेपण' कधींच घेत नाहीं. अज्ञानी मनुष्याचें मन मात्र त्याच्या शरीराशीं सबध्द होऊन राहिलेलें असल्यामुळें शरीराचे विकार त्याच्या मनावर अनिष्ट परिणाम घडवितात आणि त्याच्या चिंतनाभ्यासांत विघ्नें आणतात. याविरुध्द आपण असें पाहतों कीं श्रीरामकृष्णांसारखे सत्पुरुष, अत्यंत दुर्धर रोगाने पछाडलेले असतां देखील, सहज समाधींत जाऊं शकतात.

वरील विवेचनावरून दिसून येईल कीं पापी माणसाला दीक्षा देणें हें साक्षात्कारी पुरुषांना देखील कठीणच; कारण अनेकांवर उपकार करण्यासाठीं त्यांना आपलें शरीर टिकवायचें असतें आणि तेंच मुळीं दोघांतिघां दुर्वर्तनी माणसांसाठीं खर्ची घातल्यास त्यांच्या जागतिक कार्यास खीळ बसेल. म्हणूनच हे जे तिघे गृहस्थ आतां मठांत आले त्यांचीं पापें स्वीकारणें, त्यांना दीक्षा देणें, कोणाच मठस्थ संन्याशास साध्य वाटेना. हे संन्यासी आध्यात्मिक क्षेत्रातील अत्यंत थोर विभुति म्हणून आज पावेतों

जगांतील सर्व रामकृष्णभक्तांमध्यें प्रसिध्द आहेत. पण या तिघांचीं पापें घेण्यास आपण असमर्थ आहोंत असें लेखून त्या संन्याशांनी त्या तिघांस 'माताजींना विणवून पाहा' म्हणून सांगितलें व जयरामबटीस पाठविलें.

तिघेही माताजींकडे येऊन निवेदूं लागले-

**'आम्हां तुजप्रती । स्वामीजी धाडीती । दुरितांचीं पोथीं । असों आम्ही ।।**
**पापांचें डोंगर । जाळिती सत्वर । कृपेची नजर । टाकोनियां ।।**
**ऐसी शक्ति । वसे तव नेत्रांतरीं । दुर्गा तूं भूवरी । अससी आली ।।**
**जगध्दात्री । आतां तारी या संसारी ।**
**माता झिडकारी । का गे पुत्रां? ।।37 ।।**

माताजींचें जीवन अनेकांच्या कल्याणास्तव होतें. केवळ दोघांतिघां व्यक्तींसाठीं आपलें शरीर नष्ट होऊं द्यावयाचें हें त्यांना योग्य वाटेना. आणि दाराशीं आलेले हे तिघे तर पापांचे पर्वत. ज्यांच्या पापाग्नीने पुण्याचा महासागर सुध्दां सुकून निघेल असेच होते ते. यांना दीक्षा दिल्यास आधींच खंगलेलें आपलें शरीर अधिक काळ टिकणार नाहीं, या भीतीने माताजींनी त्यांना दीक्षा देणें प्रथम नाकारलें. पण मातेविना आतां त्या तिघांना कोठेंच आसरा नव्हता. अनन्यगतिक होऊन ते माताजींची मनधरणी करूं लागलेः

**'करि गे कृपा, माते । पदीं पतित पातलों ।**
**दुरन्त दुरितें आचरिलीं मी । दूरि लोटिसी का म्हणुनि मज ।।**
**मजसम नाहीं कोणी पापी । पापघ्नीही तुजविण आई ।**
**दाविसि काय मला? ।। असतिल बहु मी केलीं पापें ।**
**परि आलों तव पदिं अनुतापें । त्यजितां दोष तुला (मजसी)' ।।38 ।।**

संत व शास्त्रें आम्हाला सांगतात कीं जगदंबेच्या वात्सल्याचा एक क्षुद्र अंश घेऊन जगांतील सा-या माता वत्सल बनतात-आपल्या अपत्यांविषयीं एवढा जिव्हाळा दाखवितात. जर जगज्जननीच्या अनंत कोटि प्रेमरश्मींतील एखाद्या किरणाने जीवांच्या मातेंचें हृदय एवढें प्रेमळ झालेले दिसतें तर स्वयं परमात्म्याने घेतलेल्या अवताराचें वात्सल्य किती उत्कट, किती उदात्त, किती व्यापक असणार? आणि अशा अवतारी जगन्मातेकडे केलेली प्रार्थना काय व्यर्थ जाणार? ती माता काय आपल्या लेकरांचा अव्हेर करणार?

माताजींनी विचार केला, 'ज्या अर्थी बेलूर मठांतील स्वामीजींनी यांना माझ्याकडे पाठविलें आहे त्याअर्थी मी यांना दीक्षा द्यावी असाच ठाकूरांचा मानस असावा.' अखेर माताजींच्या मातृहृदयाने त्यांच्या विवेकावर मात केली! 'अनुतप्तांचें कुशल होवो. हा देह काय कायम टिकणारा आहे?' असा विचार करून त्या तिघांनाही माताजींनी दीक्षा दिली-

**दीक्षित होओनी तिघे मठा आले । चरणीं पातले मठस्थांच्या ।।**
**निवेदिती वृत्त आपुल्या दीक्षेचें । निर्व्याज प्रेमाचें माताजींच्या ।।**

**ऐकुनी तें वृत्त करिती सहर्ष । प्रेमानंद घोष भावावेशें ।।**
**'जय मा, जय मा, तुझ्या प्रेमा सीमा । नसे साक्षात् उमा जगीं तूं आली' ।।**
**रोमांचित गात्र आर्द्र त्यांचे नेत्र । रसना पवित्र माते गाते ।।**
**'प्रकृति ती परा चालवी संसारा । जोडोनियां करां तीज वदूं ।।**
**माऊली ती एक पचवी हें वीख । तिची अलौलिक' म्हणती,शक्ती' ।।39।।**

माताजींकडून दीक्षा घेऊन आलेल्या या त्रिवर्गाला पाहून मठांतील संन्याशांच्या आश्चर्याला नी आनंदाला पारावार उरला नाहीं. केवळ माताजीच अशा माणसांचें पापरूपी हलाहल पचवूं शकणार; अन्य कोणीही नाहीं, असें त्यांना वाटत होतें आणि तेंच आतां खरें ठरलें. एका जगदंबेलाच अशांना पापमुक्त करणें साध्य होतें आणि तें माताजींनी केलें! आपल्या अमित शक्तीची जगास साक्ष दिली! माताजींच्या ठायीं वसणा-या दिव्य शक्तीचा परिचय करून देणारी अशीच आणखीन् एक घटनाः

**शिष्य श्रीकालीकृष्ण अती थोर । सारदेंचे साधना करिति घोर ।।**
**तत्त्व निर्गुण चिंतिती रातदिन । मनहि त्यांचें होतसे शून्यिं लीन ।।**
**स्वामि ब्रह्मानंदांसि निवेदीती । आणि आळविती दूर करूं व्याधी ।।**
**कोणि न शके करूं कांहिंही उपाय । म्हणति पाही मा होइ का सहाय ।।**
**शिष्य जाई गुरुचरणिं शिरा ठेवी । मातृस्पर्शें प्रकृतिस्थ क्षणीं होई ।।40।।**

श्री कालीकृष्ण हे माताजींचे एक थोर शिष्य. आपली संन्यासदीक्षा त्यांनीं स्वामी विवेकानंदांकडून घेतली होती. त्यांचें संन्यासाश्रमीचें नांव होतें स्वामी विरजानंद. ते आपल्या साधनाकाळीं दिवसा 12 ते 14 तास ध्यान करीत; आणि तें सुध्दां निर्गुण तत्त्वाचें. अशा घोर साधनांमुळें त्यांचें मन शून्यांत लीन होऊं लागलें. ते अमनस्क स्थितींतच राहात. त्यामुळें त्यांना आश्रमांतील कामें करणें किंवा कोणताही व्यवहार करणें साध्य होईना. कलकत्त्यांतील बेलूर मठांत तेव्हां स्वामी ब्रह्मनंदादि थोर संन्यासी होते. त्यांच्याकडे कालीकृष्णांना पाठविण्यांत आलें. कालीकृष्णांच्या विकारावर ते संन्यासी कांहींच इलाज करूं शकले नाहींत. त्यांनी कालीकृष्णांना जयरावबटीस माताजींकडे धाडलें. माताजींकडे येतांच त्यांच्या केवळ आशिर्वादाने आणि स्पर्शाने कालीकृष्णांचा विकार पार निघून गेला! ते पूर्णपणें बरे झाले! श्रीरामकृष्णांच्या स्पर्शांत जशी किमया होती तशीच ती माताजींच्या आशीर्वादातही होती.

माताजींच्या ठायीं वसणा-या अलौकिक शक्तीचें दर्शन घडविणारा असाच दुसरा एक प्रसंगः

**वराहनगरामाजि राहती रामकृष्णशिष्य ।**
**विरक्त संन्यासी ते सारे थोर ईशभक्त ।।**
**हरीश करतो मठांत त्यांच्यापाशिं सदा येजा ।**
**वळविण्यास मन त्याचें योजी पत्नी मंत्रौषधां ।।**
**विकृति होई तयांमुळें हरिशाच्या डोक्यांत ।**

**भरांत वेडाच्या तो येई माता असे जेथ ||**
**माताजींवरि चाल करुनि ये त्यां वाटे भीती |**
**सन्निध कोणी नसती धांवति कोठाराभंवती ||**
**धान्याच्या कोठाराभंवती धांवू त्या लागल्या |**
**पाठलाग न च सोडी तरिही हरिश कांहिं केल्या ||**
**वत्सल माता न दिसे आतां दमयित्री जाहली |**
**खालिं पाडुनि हरिशा त्याच्या उरावरी बैसली ||**
**देह रपाटे जीभ ओढुनी श्रीमुखांत त्याच्या |**
**वेड निघालें बरा जाहला हरिश ताडनें त्या ||**
**साम दाम जर ठरती निष्फळ दंड हवा तेथें |**
**दंड प्रीतिचें चिन्ह असे हें जाणावें येथें ||41 ||**

सृष्टि, स्थिति व लय या एकाच वस्तूच्या एका मागून एक अपरिहार्यपणें चक्राकार गतीने येणा-या तीन अवस्था आहेत. या तीनही एकाच देवाच्या तीन शक्ति आहेत. यांमध्यें श्रेष्ठ-कनिष्ठ, चांगली-वाईट असा भेद असूं शकत नाहीं. सृजन, पालन व संहार हे सर्व परमात्म्याच्या केवळ प्रेमाचेच आविष्कार. आपल्या आनंदासाठीं, परम वात्सल्यभावाने, परमात्म्याने सृष्टीची निर्मिती केली. त्याच प्रेमाने प्रेरित होऊन तो तिचें पालन करतो आणि अंती संहारही करतो. देव उत्पत्ति मात्र करीत राहिला, संहार त्याने केलाच नाहीं, तर विश्वांत कशी आणि किती दुरवस्था माजेल याची कल्पनाच करावीं. समाजाची घडी विस्कटू न देण्यास, लोकनिती, लोकमर्यादा पाळण्यास दण्डाची अत्यंत जरूरी आहे, हें कोणीही समंजस व्यक्ति नाकबूल नाहीं करणार. माताजींनी आपली दंडशक्ति नसती दाखविली तर त्यांच्यात कदाचित् न्यूनताही दिसून आली असती. देव दयाळू आहे; पण तो दुष्टांचें दमन करणाराही आहे ही गोष्ट आपल्या ध्यानांत नित्य असावी. दुष्टांना दया दाखवावी दंडनानेच. 'ताडने बहवो गुणाः' म्हणतात ना?

एरवीं कोमल, स्नेहल माताजी प्रसंगविशेषीं कठोर होऊन शासनही करूं शकत हें हरीशच्या प्रसंगावरून आम्हाला दिसून येतें. देव आम्हाला दुःख देतो, आमच्यावर संकटें आणतो, तें आम्हास शहाणे करण्यासाठीं; आमच्यावरील त्याच्या प्रेमामुळें.

हरीश हा रामकृष्णभक्त होता. रामकृष्णांचे संन्यासी शिष्य वराहनगरमधील (कलकत्त्यांतील) मठांत असतां असतां त्यांच्याकडे हा नित्य येजा करी. त्यामुळें संसारातून आपलें मन काढून तो कदाचित् संन्यासमार्गाकडे वळेल या भीतीने त्याच्या पत्नीने त्याच्यावर औषधमंत्रादींचा प्रयोग करून त्याचें मन फिरविण्याचा प्रयत्न केला; आणि याचा परिणाम झाला विपरीत. अधूनमधून त्याला वेडाचे झटके येऊं लागलें. असाच एकदां, वेडाच्या अंमलांत असतांना तो कामारपुकूरीं माताजींवर

चाल करून आला; आणि अपकाराची फेड उपकारानेच करणा-या माउलीने त्याचें वेड नेलें. त्याचें भलें केलें.

मातासारख्या विभूति जनमनांतील मालिन्य काढतात एवढेंच नव्हे तर मिथ्याचारी, दुराचारी, माणसांच्या अशुध्द आचारविचारांमुळें कलुशित झालेलें धर्मक्षेत्रांतील वातावरणदेखील शुध्द करतात. दिव्याचें तेल संपलें म्हणजे जसें तें पुनश्च पुरवावें लागतें तसेंच धर्मक्षेत्राचें ओज कमी झालें म्हणजे त्याचें पुनरपि उद्दीपन करावें लागतें; आणि तें माताजींसारख्यांच्या सान्निध्याने. हें तत्त्व जाणूनच श्रीरामकृष्णांचे शिष्य माताजींना तीर्थाटनास घेऊन गेले व माताजींनी अयोध्या, काशी, बोधगया, हरिद्वार, प्रयाग, जयपूर, पुरी, वृंदावन, पुष्कर, राजमुन्द्री, वैद्यनाथ, मदुराई, रामेश्वर हीं तीर्थें केलीं.

अवतार व संत केवळ मनुष्यमात्रांसच उन्नत, उदात्त बनवितात असें नव्हे, तर ते आपल्या भवतांलचें वातावरणही शुध्द करतात. त्यांच्या मनांतून, शरीरांतून निघणारे स्पंद सारा परिसर पुनित करतात. अवतार जेथें जन्मतात, वास करतात तेंच आमचें क्षेत्र होतें; नाहीं का?

क्षेत्रसंचार करतां करतां माताजी रामेश्वर मंदिरीं आल्या. या मंदिराची व्यवस्था तेव्हां रामनाडच्या राजाच्या हातीं होती. राजा स्वामी विवेकानंदांचा शिष्य. माताजींची व त्यांच्या समवेत गेलेल्या सर्व यात्रिकांची अन्नपाण्याची, राहण्याची वगैरे सगळी सोय राजाने आधींच करून ठेवली होती. त्याने मंदिरांतील कार्यवाह्यांना बजावून ठेवलें होतें कीं, 'माझ्या गुरुच्या गुरु येणार. त्यांच्या सर्वसुखसोईंची तजवीज केली पाहिजे.' अशी आज्ञा झाल्यामुळें मंदिराच्या कार्यवाह्यांनी, त्यांच्या रिवाजाविरुध्द, माताजींना देवळाच्या गाभा-यांत जाऊन मनसोक्त पूजा करूं दिली. यावेळीं माताजींनी सुवर्णाच्या अष्ठ्यात्तर बिल्वदलांनी रामेश्वराची अर्चा केली. पूजा करीत असतां किचित् काळ पहात त्या स्वतःशींच पुटपुटूं लागल्या, 'मी स्थापतेवेळी हा जसा होता अगदीं तसाच अजून दिसत आहे!' हें जवळच असलेल्या ब्रह्मचारी कृष्णलाल नामक परिचारक साधूने ऐकलें. ब्रह्मचा-यानें माताजींना विचारलें, 'माताजी, काय म्हणत होतां तुम्ही?' उडवाउडवीचीं उत्तरें देऊन माताजींनी त्याला घालवून दिलें. माताजींबरोबर गेलेले साधू सांगतातः

**तीर्थांही पावन करण्या ती माता । रामेश्वरीं जातां पूजा अर्पी ।।**
**स्वर्णबिल्वदलें शिवा पूजियेलें । स्नान गंगाजलें घालोनीयां ।।**
**म्हणे शंकरातें, 'त्रेतायुगीं जैसें । स्थापिलें मी येथें वससी तैसा' ।।42।।**

काहीं दिवसांनीं सर्व मंडळी कलकत्त्यास परतली व माताजी तेथील उद्बोधन मठांत उतरल्या. यावेळीं कोलपाड्याचें केदारबाबू त्यांना तेथें भेटले व म्हणाले, 'रामेश्वर तुम्हाला कसें काय वाटलें?' माताजी उतरल्या, 'मी जसें त्याला ठेवलें होतें अगदीं तसाच तो अजून असल्याचें मला दिसून

आलें, बाळ!'

हे शब्द तेथून जात असलेल्या रामकृष्णांच्या शिष्या गोपालमा यांच्या कानीं पडले. चाणाक्ष गोपालमानीं माताजींनी लगेच विचारलें, 'काय म्हणालांत तुम्ही?' माताजी प्रश्नोत्तर देण्याचें टाळूं लागल्या; पण गोपालमा त्यांस कसच्या चुकवूं देतात. अन्तीं रहस्यभेद झाला. त्रेतायुगांत जी सीतारूपें आली होती तीच आज सारदारूपें आली आहे हें सर्वांस कळून चुकलें. रामेश्वरीं माताजी असतांना घडलेल्या सर्व घटनांचें स्मरण होऊन ते म्हणताहेतः

**'त्रेतायुगिं जी सीता झाली । तीच माउली आतां आली ।**
**राजभोग त्यजुनी जी पूर्वी । वनवासी जाहली ।।**
**काय मोह सोन्याचा तिजला? ।अलंकार ते तिजसि कशाला? ।**
**शोभा दे जी अखिल जगाला । सद्‌गुणांनि अपुल्या ।।**
**राधूसी घेण्यास सांगते । भूषण जें भांडारामधलें ।**
**आवडतें तें नीट पाहुनी । उपेक्षिते राधि तें ।।**
**सीता जी सारदा जाहली । विरक्तिची मानवी बाहुली ।**
**सान्निध्यांत तिच्या जी आली । उदास ती बनली ।।**
**विरक्त झाली राधाराणी । अमोल आभरणां अव्हेरुनि ।**
**म्हणते,' मातें न लागती हीं ।शिसपेन्सिल मज हवी' ।।43।।**

राज्यभोगांचा त्याग करणा-या सीतेने या तिच्या सारदारूपी अवतारांत सर्वप्रकारच्या लोभांचा नी भोगांचा त्याग केला होता. माताजी रामेश्वरीं असतांना रामनाडच्या राजाने मंदिराच्या कर्यवाह्यांना सांगून पाठविलें होतें कीं देवस्थानाच्या भांडारगारांतील सर्व दागदागिने माताजींना दाखवावे आणि त्यांतील जो त्यांना आवडेल ते त्यांना भेट म्हणून द्यावा. माताजींना सर्व अलंकार दाखविण्यांत आले व त्यांतील कोणताही एक निवडून घेण्यास प्रार्थना करण्यांत आली. ही प्रार्थना ऐकतांच माताजींना जणूं आकाशाची कु-हाडच कोसळल्यासारखें वाटलें. पण मनकोवळ्या माताजींना स्पष्ट नकार देऊन मंदिरांतील मंडळींची मनें दुखवितां येईना. त्या म्हणाल्या, 'मला दागिन्याशीं काय करावयाचें आहे?' जवळच त्यांची भाची राधाराणी उभी होती. तिच्याकडे बोट दाखवून मग माताजी म्हणाल्या, 'हिला एकादा दागिना हवा असल्यास तो द्या'.

माताजी असें बोलून गेल्या ख-या पण मग अंतरांत त्यांचें मन खाऊं लागलें. त्या ठाकूरांची प्रार्थना करूं लागल्या, 'ही पोर कांहींही न मागो'. प्रार्थना फळली. राधूने, 'मला कोणताच दागिना नको. एक शिसपेन्सिल तेवढी मला लागेल', म्हणून सांगितलें. हें ऐकतांच माताजींच्या जिवावरचें आधण उतरलें!

भगद्‌गीतेने आम्हापुढें ठेवलेला सर्वोच्च आदर्श माताजींमध्यें साकारित झालेला आम्हास दिसून येतो. त्यांचें जीवन साधकांस आणि

सिध्दांस, सर्वांसच अनुकरणीय असें होतें. त्यांनी प्रपंच आणि परमार्थ दोन्ही साधले. श्रीकृष्ण भगवान गीतेत म्हणतात, 'संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ । तयोस्तु कर्मसंन्यासात् कर्मयोगो विशिष्यते ।' अंतरीं विरक्ती आणि बाह्यतः अनुरक्ति वागविणा-या सारदादेवींमध्यें अशा कर्मयोगाचें स्वरूप अत्यंत प्रकर्षाने दिसून येतें. खरें प्रेम विरक्तीच्या पोटींच जन्मतें. ज्याच्या ठायीं स्वार्थ आहे तो निष्काम प्रेम कसें करूं शकणार? निष्काम मनुष्य सर्वांवर सारखेंच प्रेम करतो. सर्वांमध्यें देव पाहूं शकतो. आणि सर्व सज्जनांस प्रिय होतो. म्हणून हा एरवीं दुःखमय प्रपंच चालविणें त्यास इतरांहून अधिक सुलभ होतें. प्रपंच नेटका करावयाचा असल्यास तो संन्यस्त वृत्तींतूनच चालवावा लागतो.

'माते, सारदे! प्रपंच आणि परमार्थ दोन्ही ब्रह्मस्वरूपच आहेत हें तूं आम्हाला आपल्या जीवनाने पटवून दिलेंस.

**'परमार्थ प्रपंच दोन्ही चालवीसी । हेचि पूर्णत्वाची खूण तुझ्या ।।**
**सानथोर तूवां भेद न देखीला । सादरें सेवीला बध्द मुक्त ।।**
**राधूचिये माथीं निजपदरज । अर्पूनियां तीज धन्य केलें ।।**
**हरीशें पीडीतां वेड त्याचें नेलें । कृतार्थ त्या केलें दंडोनीयां ।।44 ।।**

माताजींच्या ब्रह्माकार दृष्टीला सगळेच समान दिसत होते. आमझादसारखे चोर-लुटारू आणि स्वामी सारदानंदांसारखे नित्यसिध्द सत्पुरुष, सारेच त्यांचे प्रिय पुत्र! सर्वांविषयीं सारखाच जिव्हाळा!

माताजींची सुरबालानामक एक एक वेडी भावजय होती. तिने केलेल्या माताजींच्या छळणुकीला तोड नाहीं. माताजींचा त्यांच्या इतर नातलगांनी देखील, केलेला छळ पाहतां वाटतें कीं अशोकवनांत असतांना केलेला क्षितिसुता सीतेचा छळसुध्दा त्याहून कितीतरी पट सुसह्य असावा. वेड्या सुरबालेचे आणि तिच्या राधाराणी नामक कन्येचे जे वाक्प्रहार माताजींना सोसावे लागले त्यांची तीक्ष्णता श्रीरामचंद्रांच्या शरमाराहून अधिक प्रखर वाटत होती!

एके दिवशीं तर केवळ शब्दताडनानेच सामाधान न पावतां राधाराणीने प्रत्यक्ष ताडनापर्यंत मजल मारली. तिने माताजी आपणास हवी तेवढी अफू खाऊं देत नाहींत म्हणून एका भल्या मोठ्या वांग्याने, आपली सारी शक्ति एकवटून, माताजींच्या पाठीवर प्रहार केला. माताजींची पाठ लाल झाली; सुजली. पण अत्यंत क्षमाशील अशा माउलीने राधूच्या कपाळास आपली पदधूलि लावून श्रीरामकृष्णांची प्रार्थना केली, 'ठाकूर! ही पोर अजाण आहे. अजाणतेपणें तिने तसें केलें. तिला क्षमा करा.' आणखिन् एका वेळी चिडून राधीने लाथ मारली! तिच्या आईने, सुरबालेने तर कहरच केला. ती माताजींवर जळती कोलीत घेऊन चाल करून आली. कोलिताने माताजींच्या डोक्यावर प्रहार करूं जाते तोंच वरदानामक एका ब्रह्मचाराने तिला अडविलें व क्रोधाने संतप्त होऊन बाहेर घालवून दिलें. अशा प्रकारें

माताजींवरचा एक कठिण प्रसंग टळला. असे हे सर्व अपराध पोटीं घालून माताजींनी आपल्या खट्याळ, खोडसाळ अप्तेष्टांना शुभाशीर्वादच दिले! चंदन कितीही घांसलें तरी सुवासच देणार.

सारे जण जिच्या शरीराचे अवयवच आहेत ती कोणावर रागावणार? ब्रह्मस्वरुपिणी माताजी मानवांप्रमाणें मोहवश मात्र कधींच झाल्या नाहींत, हें विशेषेंकरून त्यांच्या अंतकाळच्या वागणुकीवरून आणि वचनांवरून दिसून येतें. विरक्त माताजींना आपलें शरीर टिकविण्यासाठीं, 'हिला बिलगून रहा' म्हणून श्रीरामकृष्णांनी राधीसारख्याच दिसणा-या एका मुलीकडे बोट दाखवून सूक्ष्म जगतांतून आदेश दिला होता; म्हणून माताजी राधूवर निरतिशय प्रेम करीत असत. तिच्याविना राहणें त्यांना दुःसह वाटत असे. पण आपला अंतकाळ जवळ आला असतां माताजींनी सर्व व्यक्तींपासून आणि प्रापंचिक विषयांपासून आपलें मन काढून घेतलें होतें. त्यांना त्यावेळी आपल्या नातेवाईकांची उपस्थितिसुध्दां जाचक वाटे! त्यांच्यापैकी कुणीही आपल्यासमोर येऊं नये म्हणून त्यांनी सक्त ताकीद दिली होती. आपल्या महासमाधीच्या सात वर्षे अगोदर, 1913च्या मे महिन्यांत, त्या म्हणाल्या होत्या, 'राधीविषयींदेखील मला आतां आपुलकी वाटत नाहीं; पण मी बळेच ठाकूरांची प्रार्थना करून तिच्या ठिकाणीं माझें मन आसक्त करून ठेवण्याचा प्रयत्न करतें'.

राधूसाठीं माताजींनी सर्व कांहीं केलें; पण राधूला मात्र त्याची जाणीव झालेली दिसत नव्हती. माताजींना ती केवळ मनुष्य लेखत असे आणि त्यांच्याकडून केवळ ऐहिक गोष्टींचीच अपेक्षा करी. तिला, आपल्या महासमाधीच्या कांहीं दिवस आधीं, माताजी म्हणाल्या होत्या, 'मी माझें मन (तुझ्यावरच्या आसक्तीच्या) खुटीला बांधून ठेवलें होतें. तें आतां मोकळें केलें आहे. मला काय तूं मनुष्यमात्र मानतेस?' पण राधीच्या विषयाविष्ट मनांत या शब्दांनीं कांहींच प्रकाश पाडला नाहीं.

कांहींजणांना वाटत होतें कीं माताजी सर्वसामान्य सांसारिकांप्रमाणें राधूच्या ठिकाणीं आसक्त होऊन राहिल्या आहेत. पण आताच्या माताजींच्या उदासीन भावावरून नी वागण्यावरून त्यांना पूर्णपणें कळून चुकलें की माताजी मनुष्य नव्हत! त्या साकारलेल्या गुणातीत तत्त्व आहेत! माताजींच्या देहविसर्जनानंतर ते म्हणूं लागले

**मायेचा जी बुरखा घालुनि । आलि जनांच्या प्रेमालागुनि ।**
**जीवनमार्गी दीप पेटवुनि । गेली मग परतुनी ।।**
**मोहीं पडण्या मनुष्य का ती? । राधुसारखे तिज न जाणती ।**
**येती जाती तिच्यांत सारे । एकमेव सत्य ती ।।**
**तिच्या विना न च दिसे कांहिही । सृष्टी सारी मायामय ही ।**
**हाचि बोध देण्या जगता ती । नररूपें प्रकटली ।।**
**सकलांवरि करि स्नेह जीवनीं ।अंतरिं परि निष्काम राहुनी ।**

**पूर्णपणें मग विरक्त होउनि ।गांठे ती निजधाम।।45।।**

अखिल जगाचें कल्याण साधण्यासाठीं आलेल्या अवतारांचें मन सर्वव्यापी असतें. देव जसा अंतराचा साक्षी तसे तेही सर्वांचें अंतर जाणणारे असतात. एवढेंच नव्हे तर ते आपल्या स्पर्शाने किंवा सान्निध्याने देखील इतरांचें अंतर उजळूं शकतात. याचा दाखला आम्हाला श्रीरामकृष्णांच्या व सारदादेवींच्या जीवनांत सांपडतो. श्रीरामकृष्णांनी इच्छामात्रेंकरून नरेन्द्र (स्वामी विवेकानंद), मथुरबाबू इत्यादींना निर्विकल्प समाधि दिली. आपल्या अनेक इतर शिष्यांच्या जिभेवर बीजमंत्र लिहून त्यांच्यांत अखंड ध्याननिष्ठा उपजविली. कित्येकांचीं मनें तर त्यांनी आपल्या प्रेमळ कटाक्षाने कायमचींच पालटून टाकलीं-सन्मार्गाला लावलीं. माताजींच्या बाबतींतही असेंच होतें. त्यांच्या सान्निध्यांत राहणा-यामध्यें, त्यांच्या कृपेने जो मनोपालट घडून आला त्यामुळें ते देवतुल्य बनले. त्यांच्याकडून दीक्षा घेतलेल्यांना पुनर्जन्म नाहीं असें रामकृष्णमिशन मधील सारेच थोर संन्यासी मानतात. स्वतः माताजींची पण अशा अर्थाचीं वचनें आहेत.

माताजींच्या शिष्यांमध्यें यत्किंचितही बंगाली न जाणणारे असे अनेक शिष्य होते आणि माताजींना तर बंगालीवाचून इतर कोणतीच भाषा अवगत नव्हती. पण अशा शिष्यांना त्या ध्यानजपादींचे विधि शिकवूं शकल्या! मंत्रांचे अर्थ सांगू शकल्या! हे शक्य झालें कसें? याला उत्तर एवढेंच कीं माताजींची भाषा ही हृदयाची भाषा होती-दिव्य भाषा होती. ती केवळ बंगाली बोली नव्हती. म्हणूनच तिच्यांत आम्हाला ही अर्थसमर्थता दिसून येते.

आमचीं शास्त्रें आम्हाला सांगतात कीं या विश्वाच्या बुडाशीं सच्चिदानंदस्वरूप ब्रह्मच आहे. अन्य शब्दांत सांगावयाचें म्हणजे हें दृश्यविश्व ब्रह्माचा केवळ 'विवर्त' होय. छांदोग्य उपनिषद् म्हणतें, 'वाचारम्भणं विकारो नामधेयं मृत्तिकेत्येव सत्यम् ।' म्हणजे 'ज्याला आपण विकार म्हणतों तो नाममात्र आहे. तो वास्तव नव्हे. त्याला आपलें स्वतःचें असें स्वतंत्र अस्तित्व नाहीं. विकार (मडकें, पणती वगैरे). असत्य माती (तिच्या विकारांशी तुलना करतां) तेवढी सत्य'. तसेंच चित्स्वरूप ब्रह्म तेवढें सत्य; सारें नामरूपात्मक विश्व असत्य (काल्पनिक). तत्त्वाच्या ठिकाणीं अवास्तव व काल्पनिक असा जो बदल दिसतो त्याला 'विवर्त' ही संज्ञा आहे. आम्हाला दिसणारें हे विश्व असा हा ब्रह्माचा विवर्त होय.

' चित्' किंवा 'शुध्द ज्ञान' तेवढें सत्य. 'ज्ञात', किंवा ज्ञेय असे सर्व पदार्थ, असत्य कां? याचें उत्तर असें कीं आम्ही कोणतीच बाह्य वस्तु खरोखरींच पाहूं शकत नाहीं. आम्ही पाहतों ती आपल्या मनानेच घेतलेलीं रूपें-आपल्या अंतःकरणामध्यें पडलेलीं बाह्य वस्तुंचीं प्रतिबिम्बें.

आमच्या प्रत्यक्ष ज्ञानाची प्रक्रिया अशीः बाह्य विश्वांतील जीं जीं रूपें आम्ही पाहतों त्यांच्यावर अगोदर प्रकाशकिरणें पडली पाहिजेत. हे किरण

पडल्यावर त्या त्या वस्तूंतील 'रूप-तन्मात्रा' उद्दीप्त होतात-संचालित होतात आणि नंतर आम्हाला रूपज्ञान होतें. 'तन्मात्रा' म्हणजे आम्हाला ज्ञात होणा-या वस्तूंमधील शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध हे गुण. हे गुण म्हणजे कोणत्याही पदार्थाच्या ठिकाणीं राहणारे, त्या पदार्थाचें ज्ञान करून देणारे, अत्यंत सूक्ष्म असे भौतिक अंश होत. या तन्मात्रांतून उठणारे स्पंद अनुक्रमें 'कर्ण, त्वक्, चक्षु, रसना आणि घ्राण' या इंद्रियांवर आघात करून त्यांस चेतवितात. अशा चेतविल्या गेलेल्या इंद्रियांच्या तन्मात्रांतून मग जे तरंग उठतात त्यांस आमचें मन लक्षितें व त्यांस अर्थ लावतें. अशाप्रकारें आपल्या मनाने लावलेल्या या अर्थालाच आपण प्रत्यक्षज्ञान म्हणतों. अशा स्वरूपाचें हें प्रत्यक्षज्ञान परमार्थतः खरें ज्ञान नव्हे.

वरील रूपज्ञानाच्या विवेचनांत आपण पाहिलें कीं दृश्य पदार्थांतील रूपतरंग चक्षुरिंद्रीयांतील तन्मात्रांना जागवितात. मग या उत्तेजित झालेल्या तन्मात्रा दृश्य पदार्थाच्या रूपासारखें 'रूप' घेतात. या रूपाचें प्रतिबिंब मनांत पडतें, आणि आमच्या सत्त्वगुणानेयुक्त अशा मनामधील चैतनाभास (ज्ञानाभास) या प्रतिबिंबाचें रूप घेतो; मग आम्हाला प्रत्यक्षज्ञान होते.

आम्ही म्हणतों आम्हाला शब्दज्ञान, स्पर्शज्ञान, रूपज्ञान, रसज्ञान किंवा गंधज्ञान होत असतें. याचा अर्थ कीं बाह्य पदार्थातूंन उठणा-या शब्दतरंगांनी चेतविलें गेलेलें आणि जदाकारित झालेले आमच्या अंतःकरणांतील ज्ञानच आम्ही अनुभवितों. किंवा असेंही आम्ही म्हणूं शकतों कीं आम्हाला ज्ञात होतात तीं आमच्यामधील अंतःकरणोपहित चैतन्याचींच शब्दस्पर्शादि रूपें. जसे आपण आपलें प्रतिबिंब आरशांत पाहत असतां आपल्या स्वतःलाच वस्तुतः पाहत नसतां आपलें प्रतिबिंब-आपल्या शरीराचें रूप घेतलेलीं प्रकाशकिरणेंच-पाहतों, तद्वत आम्ही आमच्या मनांत त्या त्या वस्तूमधून उठलेल्या स्पंदांचें रूप घेतलेले, ज्ञानाचे किरणच(?) पाहत असतों.

आमचें प्रतिबिंबआरशांत पहावयाचें असल्यास, आमच्या शरीरावर, आरशांत व आरसा आणि आपण यांमध्यें असणा-या अवकाशांत, सर्वत्र प्रकाश असला पाहिजे. तेव्हांच आम्हास आमचें प्रतिबिंब दिसणार; नपेक्षां नाहीं हें आम्ही पाहतोंच.

शुध्द ज्ञान हें निराकार व निरवयव; म्हणून तें सर्वव्यापकच असणार. जें जें ज्ञात होतें तें तें ज्ञानाने व्यापिलें जातें; हें पुनः सांगावयास हवें का? आतां ज्ञान जर सर्वत्र, सर्वांच्या आंतबाहेर आहे तर ज्ञानेत्तर वस्तूंच्या अस्तित्वाला अवकाशच कोठून असणार? भगवान श्रीकृष्ण गीतेमध्यें म्हणतात, 'मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना । मत्स्थानि सर्वभूतानि न चाहं तेष्ववस्थितः ।' अव्यक्त ज्ञानरूप परमात्मा सर्वांचें अधिष्ठान आहे. ही चराचर सृष्टि त्याच्यांच दिसते पण याउलट, सृष्टीमध्यें परमात्मा आहे असें मात्र म्हणतां येत नाहीं. कारण सृष्टीला स्वतःचें असें अस्तित्वच नाहीं. जी

खरोखरीं 'नाहींच' तिच्यांत भगवान आहे असें कसें म्हणावें? भगवान म्हणजे शुध्द ज्ञान. सूर्यकिरणांच्या ठिकाणीं मृगजलाचा जसा भास होतो, रज्जूवर जशी सर्पाची भ्रांति होते, त्याचप्रमाणें परमात्म्यामध्यें ही सृष्टि दिसते.

या एवढ्या विवेचनावरून आपणास कळून येईल कीं आम्हास दिसणारें विश्व वस्तुतः ज्ञान स्वरूपच आहे. प्रत्यक्षज्ञान हें केंव्हांही 'सापेक्षच' असतें असें आमचें भौतिकशास्त्र सुद्दां आम्हाला सांगतें. परमार्थतः तें सत्य नव्हे. अशा ज्ञानाला 'मिथ्याज्ञान' म्हणतात. याचा अर्थ असा कीं जेव्हां मी 'मेज पाहतों' असें म्हणतों तेव्हां मी वस्तुतः मेज पाहत नसून माझ्या मनांतील ज्ञानकिरणांनी घेतलेलें मेजाचें रूप पाहतों. पण माझ्यामधील 'अज्ञानामुळें' मला वाटतें, मी वस्तुतः मेजच पाहत आहें. याप्रकारें आमचें प्रत्यक्षज्ञानच जर खोटे तर त्यावर अवलंबून राहणारीं अनुमानादि प्रमाणें 'अज्ञानमूलकच' नाहीं का ठरणार? या 'अज्ञानाला' माया किंवा 'अविद्या' असा पारिभाषिक शब्द आहे. ही माया म्हणजे परमात्म्याची एक अचिन्त्य शक्ति. या शक्तीच्या द्वारा तो सर्व दृश्य प्रपंच उभवितो, आणि पुनः याच शक्तीचा आश्रय करून-सगुण, साकारहोऊन-लोकल्याणास्तव जन्म घेतो. अशा साकारित ब्रह्मतत्त्वाचें ध्यान केलें असतां, त्याच्या दिव्य जन्माचें आणि लीलांचें चिंतन केले असतां आपलें मनोमालिन्य नष्ट होतें. मग अशा शुध्द झालेल्या मनांत परमात्मज्ञान प्रकटतें.

ज्यांच्या मतें माताजी केवळ एक व्यक्ति नसून साकारलेलें भगवत्तत्त्व आहेत असा एक भक्त सारदादेवींचें स्वरूपवर्णन करतोः

**माय माझि ती अती लाजरी । लपुनी हृन्मंदिरीं ।**
**द्वाररक्षकां कामक्रोधां । ठेवितसे द्वारीं ।।**
**स्वीय सुतांसहि न दे भेटण्या । अशी कशी ही माय ।**
**खवायुतेजाम्बुक्षितिं लपते । हिजसि करावें काय? ।।**
**अलक्ष्य राहुनि जरी अंतरीं । सुतां न भेटे मात ।**
**अविरत लक्षी स्वीय सुतां ती । प्रेमभरें दिनरात ।।46।।**

ज्याला आत्मसाक्षात्कार झाला आहे त्याला हें दृश्यजगत् फसवूं शकत नाहीं. कारण जें एकमेव सत्य, तें त्यानें जाणलेलें असतें. तो सर्वज्ञ होतो. आणि परमात्म्याच्या अवताराचें मन तर विश्वमन झालेलें असतें. या मनाचा अप्रतिहत आणि सर्वत्र संचार होऊ शकतो, हें आम्हाला माताजींच्या जीवनांतील एका प्रसंगावरून दिसून येतें.

श्रीरामकृष्णांची शिष्या योगेनमा हिचा माताजीशीं अत्यंत निकटचा संबंध होता. तिला माताजी एके दिवशीं म्हणाल्या,'काय योगेन, तूं वाळलेल्या बिल्वदलांनी देवपूजा करतेस? योगेनमा दक्षिणेश्वरहून बेलपत्रें नेऊन तीं वाळल्यावर सुध्दां त्याच दलांनीं देवपूजा करीत असे; म्हणून ती म्हणाली, 'होय, माताजी; पण तुम्हाला हें कसं कळलं?' माताजी उत्तरल्या,'मी आज ध्यानास बसलें असतां मला दिसलं कीं तूं माझी

सुकलेल्या पत्रांनी पूजा करीत आहेस'. दुस-या एका संदर्भात माताजी म्हणाल्या होत्या, 'सर्व देव-देवता माझेच अंश आहेत'. हें वचन ध्यानीं आणून योगेनमा म्हणतेः

**'जन म्हणती, 'कां भजावा सगूण । ब्रह्म हें निर्गुण असोनीयां?' ||**
**बोलणें हें बा रे सारें अज्ञानाचें । तत्त्व तें आत्म्याचें गुणातीत ||**
**सगुण निर्गुण दोन्ही भेद जाण । आत्म्याची जो खूण नेणे त्याचे ||**
**सारदेसी भजा, सारदेसी भजा । अज्ञानाच्या भेदा जाळील ती ||**
**माय माझी आहे सगुण निर्गुण । आणिक निर्वाण गुणातीत' ||47||**

माताजींचें पार्थिव शरीर फार काळ टिकणार नाहीं, त्यांच्या सहवासाला आपण लवकरच मुकणार, या भीतीने एक स्त्री माताजींकडे येऊन कळवळून म्हणाली, 'माताजी, माझ्यामनाला अजून खरी शांति लाभलेली नाहीं. मी काय करावें?'

माताजी आश्वासून म्हणाल्या,

**'भय कसलें तें भय कसलें । ठाकुरांसि पाहिलें तुवां मग? ||धृ||**
**शांति मना जरि इच्छिसि मिळवूं ।परछिंद्रिं नको डोळा ठेवूं ।**
**करि यत्ना निज दोषां शोधूं । मान आप्त सकलांसी||**
**दुजाभाव जनिं न कदा ठेवूं ।शिक त्यां आत्मीयत्वें पाहूं ।**
**परका न दिसे जातां शोधू ।ज्या त्याच्या मनिं शांति वसे ||**
**पाठीराखा ठाकुर असतां ।मीहि तुझीच असोनी माता ।**
**सकलां स्वीय म्हणोनि भावितां ।कसली तुज चिंता||48||**

कोणाचेही दोष पहावयाचे असल्यास आमचें मन अगोदर दूषित झालें पाहिजे. कोणत्याही वस्तूचें रूप पहावयाचें असल्यास आमच्या चक्षूंत जशा रूप (प्रकाश) तन्मात्रा असल्या पाहिजेत, तद्वत्. चक्षूंनी पाहिलेल्या रूपाचे आमच्या मनावर जसे संस्कार होत असतात तसेंच मन डागळलें जातें. अशुध्द संस्कारांनी युक्त असें मन अतिपवित्र परमात्म्याचे चिंतन करण्यास असमर्थ बनतें. एवढेंच नव्हे तर अशा दूषित मनाला सद्‌गुण ते दुर्गुण वाटतात आणि दुर्गुण, सद्‌गुण भासतात. दुष्टाशीं मैत्री आणि सुष्टाशीं वैर करण्याकडे अशा मनाची प्रवृत्ति असते. दुर्योधनादींचा पांडवांशीं वैरभाव, शिशुपालादींचा कृष्णाशीं दुर्भाव, हीं याचीं प्रसिध्द उदाहरणें होत. अनवधानाने माडीवरून टाकलेला चेंडू पाय-यांवरून कोसळत कोसळत जसा तळ गांठतो तसा दोषद्रष्टा दोषचिंचनाने शेवटीं रसातळीं बुडतो. आपल्या आध्यात्मिक जीवनाचें पूर्ण मातेरे करून घेतो.

इक्षरांचे दोष, न पाहतां राहणें ही कांहीं सोपी गोष्टी नव्हे. ईश्वरी कृपेची, परमात्मचिंतनाची आमच्या प्रयत्नांना जोड मिळल्यावांचून दोषदर्शनाची सवय मोडणें अत्यंत दुःसाध्य. ज्या प्रमाणांत आम्ही भगवंतावर प्रेम करूं त्या प्रमाणांत या आमच्या प्रयत्नांत आम्हाला यश मिळेल.

जो सर्वांमध्ये देव पाहतो, ज्याला हें सारें विश्व खोटें आहे-सर्व गुणदोष

अज्ञाननिर्मित आहेत-हें उमजलें आहे, त्यालाच कोणांतही दोष दिसणार नाहींत. याच अर्थ असा नव्हे की आमच्यातील गुणदोष साक्षात्कारी माणसाला अजीबात दिसत नाहींत. त्याला ते अवश्य दिसतील, पण ते सारे नश्वर, आगमापायी (येणारे नी जाणारे), असेंच तो मानील. या गुणांची वा दोषांची जाणीव त्याच्यांत राग वा द्वेष निर्माण करणारी नाहीं.

चांगल्या-वाईटाचें आम्ही चिंतन करीत राहूं तर त्यामुळें आमच्यांत रागद्वेष उत्पन्न होतील. राग किंवा आसक्ति म्हणजे आम्हांस घडणारें सुखद गोष्टीचें चिंतन (सुखानुशायी रागः।). द्वेष म्णजे दुःखद गोषटीचें मनन (दुःखानुशायी द्वेषः।). राग अन् द्वेष हींच आमची खरीं बंधनें होत. यांपासून जो मुक्त झाला तो जन्ममरणाच्या पार गेला असें समजावें. शुभाशुभ विषयांचें मन्थन करण्याची संवय अनादि कालापासून आमच्या मनाला जडलेली आहे. सर्व साधारण माणसांच्या मनामध्यें उपजतच कांहीं विषयांची आवड तर कांहींची नावड दिसून येते. त्यामुळें त्यांच्यात राग किंवा दोष निर्माण होणें साहजिकच असतें. अनुकुल किंवा प्रतिकूल विषयांच्या चिंतनांत राहणें हा त्यांच्या मनाचा नैसर्गिक स्वभाव. अशा चिंतनाने विषय त्यांच्या मनाला जणूं चिकटून बरबटून टाकतात. पण अनासक्त, साधु पुरुषाचें मन शुध्द आरशाप्रमाणें असतें. आरशांत पडणारें प्रतिबिम्ब, तें मग कितीही अशुध्द वस्तूचें का असेना तें आरशाला मालिन्य आणीत नाहीं. त्याप्रमाणें सत्पुरुषांना दिसणारे दोष त्यांच्या मनावर कोणताच दुष्परिणाम करूं शकत नाहींत. आपली दौषेकदृष्टि काढण्यास, आपलें मन शुध्द करण्यास, देशकालातीत अशा आत्मतत्त्वाचें सतत अनुसंधान हवें. पण असें अनुसंधान करणें सामान्य जणांना बिकट. त्यांनी 'आपण सारदादेवींची अपत्यें; म्हणून आपण पूर्णकाम आहोंत' असें चिंतन करावें. सारदादेवी म्हणजे साकार मातृतत्त्व असल्यामुळें तीच आमची खरी माता-जन्मोजन्मींची आई. आपल्या पार्थिव माता केवळ या जन्मापुरत्याच. त्या शरीरांची वेशभूषा करून जगाच्या रंगभूमीवर आलेल्या व आमच्या या आयुष्याचा अंक संपेपर्यंतच राहणा-या. आमच्या पितरांमध्यें आमच्याविषयीं वात्सल्यभाव उपजविणारी, आमचें संगोपन करण्याची त्यांस शक्ति नी बध्दि देणारी, आमच्या सर्व तापांचें अन् दुःखांचें शमन करण्यास अखंड सुखाचा लाभ करून घेण्यास, जें सारभूत' ज्ञान आवश्यक आहे तें आम्हास देणारी 'सारदा', तीच आमची खरी माता. मातृज्ञानाने जर आम्ही सारदादेवींचे सदैव चिंतन करूं तर आम्ही खचित तरून जाऊं. तसें माताजींनी आम्हाला वचनही दिलें आहे. म्हणतात कीं, 'असद्भिः शपथेनोक्तं जले लिखितमक्षरम् । सद्भिस्तु लीलया प्रोक्तं शिलालिखितमक्षरम् ॥' माताजींचें अभिवचन, त्यांचें हें वाग्दान, म्हणजे आम्हास भवसागर तरून जाण्यास अनायासें लाभलेली अभंग तरणी होय. त्यांच्या आश्वासनावर विश्वांसून त्यांच्या नांवाचा गजर करीत आम्ही गाऊंयांः

**आम्ही सारदेचिं लेकरें । सांगा काय अम्हा हो उणें? ।।**
**अधरीं अमुच्या राहि सारदा । हृदयीं संतत फुलवित मोदा ।**
**मोदतरंगावरी चढवुनी । ने ती ब्रह्मपदा ।।**
**सा-यां दुःखां कारण 'मी, मी' । म्हणणें हें तिजसी विस्मरुनी ।**
**न मी' म्हणत जो सारदे नमी । जाई भव तरुनी ।।49 ।।**

---

**कांहीं नावांची सूची**
गदाई, गदाधर - श्रीरामकृष्ण परमहंस
गोलापमा - श्रीरामकृष्णांची एक शिष्या
चंद्रमणी, चंद्रा, चंद्री - श्रीरामकृष्णांची आई
ठाकूर - रामकृष्ण परमहंस
माताजी - श्रीसारदादेवी
योगेनमा - रामकृष्णांची एक शिष्या
राधाराणी, राधी, राधू - माताजींची भाची
रामचंद्र मुखर्जी - माताजींचे वडील
श्यामसुंदरी - माताजींची आई
सारदा, सारदामणी, सारू - सारदादेवी
सुरबाला - माताजींची भावजय
हृदय, हृदयराम, हृदू - रामकृष्णांचा भाचा

---

**आमची निशाणी**

वर दिलेल्या आमच्या निशाणीतील ओंकार परमात्म्याचें प्रतिक आहे. कमळ गंधतत्त्वाचे वा पृथ्वीतत्त्वाचे सूचक आहे. पाणी आप तत्त्वाचे, सूर्य तेजाचा आणि लाटा वायूच्या द्योतक आहेत. मधील अवकाश आकाशतत्त्व दाखवितो. अर्थात ओंकाररुपी परमात्मा या पांचभौतिक सृष्टीला एका पादाने (चतुर्थांशाने) व्यापून तिच्या अतीतही आहे (पादोऽस्य विश्वा भूतानि त्रिपादस्यामृतं दिवि). हा परमात्मा एकमेव सत्य असून ज्ञाते लोक याला नाना नांवांनी संबोधितात.

**श्रीरामकृष्ण आश्रम, कारवार (कर्नाटक)**

---

द्वितीय आवृती
**प्रकाशक - स्वामी भवेशानंद**
रामकृष्ण आश्रम, कारवार (कर्नाटक) - 581 301 फोन नं. 226824
सर्व हक्क - प्रकाशकाचे स्वाधीन
टंकलेखन सेवा - श्री. दयानंद महादेव धनवडे Mob.09890520365
कैवल्य 924/30, विवेक कॉम्प्युटर हाऊस,हुपरी.416 203
www.vchindia.com, Email:vchindia@gmail.com